बी.एम. प्रतिष्ठान
बी.एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादक:बाळासाहेब मस्के

बीड | बुधवार,दि.१६ऑक्टोबर २०२४ | वर्ष४रे | अंक७४वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

## मंदिर म्हणजे ट्रस्टींची खासगी मालमत्ता नाही!

दिल्ली:राजस्थानमधील महाकालेश्वर महादेव जी सिद्ध धाम मंदिराच्या ट्रस्टींनी उच्च न्यायालयात दाखल केलेली याचिका न्यायालयाने फेटाळून लावताना ट्रस्टींनाच फटकारलं आहे. अनुसूचित जातीच्या एका महिलेनं मंदिराच्या प्रतिबंधित भागामध्ये प्रवेश करण्याचा प्रयत्न केल्यावर ट्रस्टींनी तीव्र आक्षेप घेतला. हे प्रकरण थेट उच्च न्यायालयापर्यंत पोहोचल्यानंतर न्यायालयाने त्यावर परखड टिप्पणी करत ट्रस्टींचा युक्तिवाद फेटाळून लावला.महाकालेश्वर महादेव जी सिद्ध धाम मंदिराच्या ट्रस्टींनी मंदिरात काही ठिकाणी बॅरिकेट्स उभे करून सामान्य लोकांना मंदिराच्या त्या भागांमध्ये प्रवेश करण्यास बंदी घातली. मंदिरात एका मर्यादेच्या पुढे लोकांना जाण्यास मनाई करण्यात आली. मात्र, एका महिलेनं हे बॅरिकेट्स ओलांडून पुढे जाण्याचा प्रयत्न केला.

# 'RSS'वर कॅनडामध्ये बंदी घाला!

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी
निज्जर हत्याप्रकरणात भारतीय उच्चायुक्त संजय कुमार वर्मा आणि इतर अधिकाऱ्यांचा समावेश आहे, असा गंभीर आरोप कॅनडाने पुन्हा एकदा केला असून भारतीय उच्चायुक्तांना देश सोडण्यास परत जाण्यास सांगितलं आहे. यालाच प्रत्युत्तर म्हणून भारतानेही कॅनडाच्या उच्चायुक्तांसह सहा राजनैतिक अधिकाऱ्यांना भारत सोडण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणावरून दोन्ही देशातील संबंध कमालीचे ताणले गेले असताना कॅनडातील न्यू डेमोक्रॅटिक पार्टीच्या प्रमुखांनी कॅनडात राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर बंदी घालावी, अशी मागणी केली आहे. त्यांच्या या मागणीनंतर आता विविध राजकीय चर्चांना उधाण आलं आहे.

न्यू डेमोक्रॅटिक पार्टीच्या प्रमुखाची मागणी | दोन देशात निर्माण झाले तणावाचे वातावरण | आरोप:नरेंद्र मोदी सरकारच्या अधिकाऱ्यांचा समावेश


## कॅनडाच्या उच्चायुक्तांसह राजनैतिक अधिकाऱ्यांना भारत सोडण्याचे आदेश

न्यू डेमोक्रॅटिक पार्टीचे प्रमुख जगमीत सिंग यांनी एक्स समाज माध्यमावर पोस्ट करत यासंदर्भात प्रतिक्रिया दिली आहे. निज्जर हत्याप्रकरणी रॉयल कॅनेडियन माउंटेड पोलिसांनी जी माहिती दिली आहे, ती धकादायक आहे. त्यामुळे न्यू डेमोक्रॅटिक पार्टीत चिंतेत आहे. या प्रकरणामुळे कॅनडातील शिख समुदायातही भीतीचं वातावरण आहे, असे ते म्हणाले.कॅनडाचे नागरिक हरदीपसिंग निज्जर यांच्या हत्येत नरेंद्र मोदी सरकारच्या अधिकाऱ्यांचा समावेश आहे, असा आरोप कॅनडा काही महिन्यांपासून करतो आहे. त्याचे पुरावेदेखील आमच्याकडे आहेत. मात्र, याप्रकरणी अद्याप

पान २ वर...




कॅनडा सरकारने कॅनडातील भारतीय उच्चायुक्तांना परत पाठवण्याचा निर्णय घेतला आहे. आम्ही या निर्णयाचं स्वागत करतो. तसेच आम्ही कॅनडाच्या सरकारला विनंती करतो की त्यांनी भारतावर विविध निर्बंध लागू करावेत. याशिवाय कॅनडा सरकारने कॅनडात राष्ट्रीय स्वयंसेवक संघावरही बंदी घालावी आणि कॅनडातील नागरिकांची सुरक्षा सुनिश्चित करावी, अशी मागणीही जगमीत सिंग यांनी केली.


CHEF DU NOUVEAU PARTI DÉMOCRATIQUE DU CANADA | LEADER OF THE NEW DEMOCRATIC PARTY OF CANADA

JAGMEET SINGH

DÉPUTÉ | MP, BURNABY SOUTH | BURNABY-SUD

October 14, 2024

**STATEMENT FROM JAGMEET SINGH ON EXPULSION OF INDIAN DIPLOMATS, CRIMINAL INVESTIGATION**

TORONTO — "New Democrats are extremely worried about the information released by the RCMP commissioner today. Canadians, particularly the Sikh community in Canada, have been stalked by fear, threats, harassment and violence — including extortion, violence and electoral interference all allegedly at the hands of Indian officials.

Canada has long held credible evidence that the Narendra Modi government was involved in the murder of Canadian Hardeep Singh Nijjar on Canadian soil, and the United States has already indicted multiple individuals for related crimes — yet NDP had to fight just to have potential subversive activity by India included in the scope of the inquiry into Foreign Interference.

Since September 2023, at least 13 people have been warned by the RCMP of grave threats against them. The safety of Canadians has not yet been assured.

New Democrats' main priority is to ensure that all Canadians are safe in our country – free from extortion, violence and electoral interference. In the interest of protecting Canadians and our country, I urge all leaders to get their security clearance and hold the Modi government accountable and refuse to look the other way.

We support today's decision to expel India's diplomats and we're calling on the Government of Canada yet again to put diplomat sanctions against India in place, ban the Rashtriya Swayamsevak Sangh Network (RSS) in Canada, and commit to pursuing the most severe consequences for anyone found to have participated in organized criminal activity on Canadian soil."

# कोरियाला जोडणारा रस्ता केला उद्ध्वस्त

देशविदेश: हुकूमशहा किम जोंग उनच्या हालचालीमुळे तणाव



दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी
गेल्या काही दिवसांपासून इराण आणि इस्त्रायलमध्ये तणावाचं वातावरण आहे. त्यातच इस्त्रायलने लेबनॉनमधील हेजबोलावर हल्ले केल्यामुळे तेथील परिस्थिती तणावपूर्ण आहे. यातच आता उत्तर कोरिया आणि दक्षिण कोरियामध्ये तणाव वाढला आहे. उत्तर कोरिया आणि दक्षिण कोरिया

पान २ वर...

### दोन्ही देशात नेमका वाद काय?

दक्षिण कोरिया आणि उत्तर कोरियामध्ये तणाव निर्माण झाला आहे. उत्तर कोरियाने दक्षिण कोरियावर हवाई हद्दीचे उल्लंघन केले असल्याचा आरोप केला आहे. याबरोबरच उत्तर कोरियाची राजधानी प्योंगयांग या शहरात दक्षिण कोरियाने ड्रोनच्या माध्यमातून पत्रके टाकल्याचा आरोप उत्तर कोरियाने केला आहे. त्यानंतर उत्तर कोरियाचे हुकूमशहा किम जोंग उनच्या बहिणीने दक्षिण कोरियाला उद्ध्वस्त करण्याची धमकी दिली आहे.

### दक्षिण कोरियाने काय म्हटलं?

उत्तर कोरियाने केलेले सर्व आरोप दक्षिण कोरियाने फेटाळून लावले आहेत. तसेच जर उत्तर कोरियाने काही चुकीचा निर्णय घेतला किंवा चुकीचे पाऊल उचलले तर दक्षिण कोरिया देखील चोख प्रत्युत्तर देऊल असा इशारा दक्षिण कोरियाने उत्तर कोरियाला दिला आहे. दरम्यान, उत्तर कोरियाचे हुकूमशहा किम जोंग उन यांनी दक्षिण कोरियाबरोबरचे संबंध तोडण्याचा इशारा दिला आहे. तर दुसरीकडे उत्तर कोरियाने रस्ते उद्ध्वस्त केल्यानंतर प्रत्युत्तर देत दक्षिण कोरियानेही दक्षिण सीमेवर गोळीबार केल्याचं दक्षिण कोरियाच्या जॉइंट चीफ ऑफ स्टाफने सांगितलं.

# बीडच्या खासदारांचे मुख्यमंत्र्यांना पत्र!

ट्रेनी शिक्षकांचा कालावधी वाढविण्याची केली मागणी

बीड/प्रतिनिधी
शासनाने 'मुख्यमंत्री' युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंर्गत ट्रेनी शिक्षक पदभरती केलेली आहे.त्याचा कालावधी सहा महिन्यांचा आहे.परंतू या कालावधीत शैक्षणिक वर्ष पूर्ण होत नाही. त्यामुळे वाढीव कालावधी देवून निवड झालेल्या ट्रेनी शिक्षकांना दिलासा द्यावा.अशा मागणीचे पत्र खा.बजरंग सोनवणे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिले आहे.

राज्य शासनाकडून 'मुख्यमंत्री' युवा कार्य प्रशिक्षण योजना कार्यान्वित आहे. त्या योजनेच्या माध्यमातून राज्यातील जिल्हा परिषद शाळेत ट्रेनी शिक्षकांची पदभरती करण्यात आली आहे.मात्र शैक्षणिक वर्ष पाहता, सहा महिन्यांचा कालावधी पूर्ण होत नाही.त्यामुळे 'मुख्यमंत्री' युवा कार्य



प्रशिक्षण योजनेचा कालावधी वाढविणे आवश्यक आहे.असे निवेदन प्रशिक्षणार्थींनी माझ्याकडे दिले आहे.त्या निवेदनातून त्यांनी विनंती केली आहे की, खासदार या नात्याने आमची मागणी राज्य सरकारकडे कळवावी आणि ट्रेनी शिक्षकांना न्याय मिळवून द्यावा. बीडसह राज्यातील ट्रेनी शिक्षकांचा हा प्रश्न

पान २ वर...

बेरोजगार युवकांच्या हाताला काम मिळावे, त्यासाठी राज्य शासनाने 'मुख्यमंत्री'युवा कार्य प्रशिक्षण योजना राज्यात सुरु केली.परंतु सदरील योजना राबवित असतांना ती पूर्णपणे यशस्वी होते का? हे पाहणे महत्वाचे आहे. मात्र प्रशिक्षणार्थी यांच्या निवेदनातून स्पष्ट होते की, या योजनेचा कालावधी शैक्षणिक वर्षात पूर्ण होत नाही. ही बाब लक्षात घेवून खा. बजरंग सोनवणे यांनी मुख्यमंत्री यांना पत्र पाठवून कालावधी वाढविण्याची मागणी केली.त्यामुळे ट्रेनी शिक्षकांना दिलासा मिळणार आहे.

# महाराष्ट्रात निवडणूक जाहीर!

पत्रकार परिषद: कशी असणार संपूर्ण प्रक्रिया?




दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी
महाराष्ट्र विधानसभा निवडणूक ही एकाच फेजमध्ये होणार आहे. संपूर्ण राज्यात एकाच दिवशी मतदान पार पडणार आहे. महाराष्ट्रात २० नोव्हेंबरला मतदान पार पडणार आहे. तर २३ नोव्हेंबरला मतमोजणी केली जाईल, अशी महत्वाची माहिती निवडणूक आयुक्तांनी दिली. विधानसभेच्या निवडणुकीसाठी अर्ज करण्याची तारीख ही २२ ऑक्टोबरपासून सुरु होईल. उमेदवार २९ ऑक्टोबरपर्यंत आपला अर्ज दाखल करु शकणार आहेत. यानंतर ३० ऑक्टोबरला सर्व उमेदवारांच्या अर्जाची छाननी होईल. तर ४ नोव्हेंबर २०२४ ला

पान २ वर...

# हरियाणापासून शिका,पाय जमिनीवर ठेवा!

राजकीय:राहुल गांधींचा महाराष्ट्रातील नेत्यांना इशारा

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी
८ ऑक्टोबरला हरियाणा आणि जम्मू काश्मीर या दोन राज्यांचे निकाल लागले. हरियणात काँग्रेस जिंकणार असे अंदाज सगळ्या एक्झिट पोल्सनी वर्तवले होते. मात्र सगळे अंदाज फोल ठरवत हरियाणात भाजपाने बाजी मारली. भाजपाला हरियाणात सलग तिसऱ्यांदा सत्ता मिळाली आहे. यानंतर आता महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक आजच



जाहीर झाली आहे. २० नोव्हेंबरला महाराष्ट्र विधानसभा निवडणूक होणार आहे तर २३ नोव्हेंबरला निकाल लागणार आहे. याआधी सोमवारी काँग्रेस नेत्यांची एक बैठक सोमवारी दिल्लीत पार पडली. या बैठकीत महाराष्ट्रातल्या काँग्रेसच्या दिग्गजांना पाय जमिनीवर ठेवण्याचा सल्ला राहुल गांधींनी दिला आहे.सोमवारी दिल्लीत एक बैठक पार पडली. या बैठकीत लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी महाराष्ट्रातल्या दिग्गज नेत्यांना

पान २ वर...

# मोसमी पावसाची देशातून माघार!

निसर्ग:दक्षिणेत ईशान्य मोसमी पाऊस सक्रिय

मुंबई /पुण्यभूमी प्रतिनिधी
महाराष्ट्रासह संपूर्ण देशातून मोसमी पाऊस यंदा अपेक्षित वेळेत परतला आहे. मोसमी पावसाने मंगळवारी (१५ ऑक्टोबर) देशातून पूर्णपणे माघार घेतली असून, दक्षिण भारतात ईशान्य मोसमी पाऊस सक्रीय झाला आहे. यंदा दरवर्षीपेक्षा एक दिवस आधी, ३० मे रोजी केरळमध्ये मोसमी पाऊस दाखल झाला होता.

भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, यंदा नियोजित वेळेपेक्षा सात दिवस उशिरा २३ सप्टेंबर रोजी मोसमी पावसाचा परतीचा प्रवास दक्षिण राजस्थान आणि गुजरातच्या कच्छमधून सुरू झाला. दोन ऑक्टोबरपर्यंत गुजरात, राजस्थानच्या बहुतांश भागासह लेह, लडाख, जम्मू आणि काश्मीर, पंजाब,

पान २ वर...

डॉ.योगेश क्षीरसागर | बीडमध्ये कोटींच्या कामाचे उदघाटन

# उर्दू घर उभारुन बाबा सिद्दीकींचे नाव देणार

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी
प्रलंबित असलेला उर्दू घर व मुस्लिम मुलींच्या वसतिगृहाचा प्रश्न येत्या वर्षभरात सोडविला जाईल. त्यासाठी शासन दरबारी सतत पाठपुरावा सुरू आहे. उर्दू घर उभारून त्याला राष्ट्रवादी काँग्रेसचे दिवंगत नेते बाबा सिद्दीकी यांचे नाव देण्याचा ठराव मी मुस्लिम बांधवांसमोर मांडला. या ठरावास सर्वांनी एकमुखाने पाठिंबा देत होकार दिला आहे, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली.

बीड शहरातील नाळवंडी नाका भागातील जुनी ईदगाह मैदानाचे सुशोभीकरण, बांधकाम यासाठी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून महाराष्ट्र सुवर्ण जयंती शहरी नगरोत्थान महाभियान (जिल्हास्तर) या योजनेतून १ कोटींचा निधी मंजूर केला होता. या कामाचे भूमिपूजन सोमवारी (दि.१४) डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आहे. हे केवळ बोलण्यापुरते मर्यादित न ठेवता अजितदादा व धनुभाऊ यांच्या माध्यमातून कृतीतून सिद्ध करून

पान २ वर...



### ख्रिश्चन स्मशानभूमीसाठीदिला ५० लाखांचा निधी

महाराष्ट्र अल्पसंख्यांक विभागाच्या योजनेतून बीड शहरातील अंकुश नगर भागातील ईडन गार्डन (ख्रिश्चन स्मशानभूमी) येथे ५० लक्ष रुपयांचा निधी दिला असून डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. यावेळी ख्रिश्चन धर्मगुरू चार्ल्स सोनवणे, नगरसेवक भीमराव वाघचौरे, गणेश वाघमारे, मरियन रेड्डी, आशिष शिंदे , किशोर पाटील, मथ्यू जोसेफ, पास्टर संजय गायकवाड, पा.अमृत सोनावणे, गजानन जवकर, बिपिन देशमुख, सुशांत सत्राळकर, प्रेमविजय भागतिलक आदी उपस्थित होते.

ख्रिश्चन स्मशानभूमीसाठीदिला ५० लाखांचा निधी

महाराष्ट्र अल्पसंख्यांक विभागाच्या योजनेतून बीड शहरातील अंकुश नगर भागातील ईडन गार्डन (ख्रिश्चन स्मशानभूमी) येथे ५० लक्ष रुपयांचा निधी दिला असून डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. यावेळी ख्रिश्चन धर्मगुरू चार्ल्स सोनवणे, नगरसेवक भीमराव वाघचौरे, गणेश वाघमारे, मरियन रेड्डी, आशिष शिंदे , किशोर पाटील, मथ्यू जोसेफ, पास्टर संजय गायकवाड, पा.अमृत सोनावणे, गजानन जवकर, बिपिन देशमुख, सुशांत सत्राळकर, प्रेमविजय भागतिलक आदी उपस्थित होते.

# विमानांना बॉम्बने उडवण्याची धमकी

भयभित: विमानाचे आपत्कालीन लँन्डिंग!




दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी
गेल्या काही दिवसांत विमानांमध्ये बॉम्ब असल्याच्या धमक्याच्या अनेक घटना समोर येत आहेत. या अशा प्रकारच्या धमक्याच्या घटनांमध्ये वाढ होताना दिसत आहे. आता मंगळवारी देखली सात वेगवेगळ्या विमानांमध्ये बॉम्ब असल्याची धमकी मिळाल्यामुळे मोठी खळबळ उडाली. त्यामुळे सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

एअर इंडिया एक्स्प्रेसच्या एका विमानात बॉम्ब असल्याची धमकी मिळाली होती. त्यानंतर उत्तर प्रदेशातील महर्षि वाल्मिकी विमानतळावर या विमानाचे आप्तकालीन लँन्डिंग करण्यात आले, तर दुसरीकडे दिल्लीवरून शिकागोला जाणाऱ्या एका एअर इंडियाच्या विमानात बॉम्ब असल्याची धमकी मिळाली होती. त्यानंतर दिल्लीवरून शिकागोला जाणाऱ्या विमानाचे कॅनडामध्ये आप्तकालीन लँन्डिंग करण्यात आले. दरम्यान, मंगळवारी एअर इंडियाच्या विमानासह सात वेगवेगळ्या विमानांमध्ये बॉम्ब असल्याची धमकी देण्यात आली होती

पान २ वर...

## दशमीचा दुभंगानंद!

आजच्या महाराष्ट्रासमोरची सर्वात गंभीर समस्या कोणती? अर्थव्यवस्थेची स्थिती आणि वाढती कर्जे, कायदा–सुव्यवस्थेचा अभाव, अन्य राज्यांकडून वाढती स्पर्धा, खेळासकट अन्य अनेक क्षेत्रांत होणारी महाराष्ट्राची पीछेहाट, शहरांचे बकालीकरण हे सर्व वा आणखी काही मुद्दे समस्या ठरत नाहीत; असे नाही. या समस्या आहेतच. पण या सर्व समस्यांचे मूळ आहे ते महाराष्ट्राचे अत्यंत वेगाने होणारे अंतर्गत विलगीकरण. या राज्याचे झपाट्याने होत चाललेले कप्पे. हे कप्पे आर्थिक तर आहेतच. पण आर्थिक कप्पे कायम असतातच आणि काही अंशी असणारच. पण आजच्या महाराष्ट्रासमोरचे खरे आव्हान आहे ते वाढता सामाजिक दुभंग; हे. कसे; ते समजून घेणे आवश्यक आहे.

या दुभंग विश्लेषणाचे वरवरचे लक्षण म्हणजे विजयादशमीच्या मुहूर्तावर वाढू लागलेले विविध मेळावे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९५६ साली नागपुरात १४ ऑक्टोबरला बौद्ध धर्म स्वीकारला. त्या दिवशी विजयादशमी होती. ते सर्वार्थी सीमोल्लंघन होते. त्यामुळे विजयादशमीदिनी नागपूरच्या दीक्षाभूमीवर त्यांचे हजारो अनुयायी या सीमोल्लंघनाच्या स्मरणार्थ जमतात. त्याच्या आधी सुमारे चार दशके याच दिवशी डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली. त्यामुळे विजयादशमीस संघ समर्थक रेशीमबागेत वर्धापन दिन साजरा करतात. हे दोन्ही नागपुरात एकमेकांपासून हाकेच्या अंतरावर. विजयादशमीदिनी या दोन मेळाव्यांची ऐतिहासिक परंपरा महाराष्ट्राला आहे. यावर्षी सरसंघचालक मोहनराव भागवत यांनी आपल्या भाषणातून 'रेशीमबाग' ते 'दीक्षाभूमी' हे अंतर कमी करायचा प्रयत्न केला. 'दलित म्हणावा आपुला' हा त्यांच्या भाषणाचा सारांश. संघ विचाराने चालणाऱ्या भाजपची ती सध्याची राजकीय निकड होतीच. ती पूर्ण झाली. ते ठीक याखेरीज साठच्या दशकापासून महाराष्ट्रात लक्षणीय ठरत गेला तो शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा मुंबईत शिवाजी पार्कात भरणारा विजयादशमी मेळा. 'विचारांचे सोने लुटण्यासाठी' सेना नेते, कार्यकर्ते शिवाजी पार्क मैदानात ऊर्फ शिवतीर्थावर या दिवशी जमत. त्यातील वैचारिक मौक्तिकांच्या मूल्याबाबत मतभेद असू शकतात. बाकी काही मिळो वा न मिळो, शिवसेनाप्रमुखांच्या भाषणांतून दोन गोष्टी अवश्य मिळत. मनोरंजन आणि शिवसेनेच्या पुढील वाटचालीबाबतची दिशा. हा पक्ष आगामी काळात कोणत्या दिशेने जाऊ इच्छितो याचा काही प्रमाणात अंदाज या मेळाव्यातून मिळत असे. दोन वर्षांपूर्वी एकनाथ शिंदे याच्या पक्षत्यागाने या एका मेळाव्याचे दोन मेळावे झाले. शिवसेनेस पाठिंबा देणाऱ्या मराठी माणसाचा दुभंग दोन मेळाव्यांतून अधोरेखित झाला. त्यात न्यायालय तसेच निवडणूक आयोगादी यंत्रणांचे सौजन्य आणि सत्ताधारी भाजपची गरज यांमुळे अधिकृत शिवसेनेचा दर्जा शिंदे यांच्या सेनेस मिळाला. त्यामुळे त्यांचा मेळावादेखील सेनेचा अधिकृत मेळावा ठरला. शिंदे यांच्याआधी बाळासाहेबांचे पुतणे राज यांनी शिवसेनेकडे पाठ फिरवून स्वत:ची सेना स्थापन केली. बाळासाहेबांच्या उद्धव शिवसेनेची विजयादशमी म्हणून मग राज यांच्या सेनेचा गुढीपाडवा अशी ही विभागणी. यावर्षी तंत्रज्ञानाच्या साहाय्याने राज यांनी विजयादशमीदेखील आभासी वास्तवात पाळली. तेवढेच सीमोल्लंघन! विजयादशमीस विदर्भात रा. स्व. संघ, बौद्ध मेळावे, मुंबईत बाळासाहेब ठाकरे सेना आणि एकनाथ शिंदे–चलित सेना यांचे मेळावे असताना मराठवाड्यातही अशी मेळावे परंपरा झाली. विदर्भ आणि मुंबई या ठिकाणच्या प्रत्येकी दोन मेळाव्यांस ज्याप्रमाणे एक सामाजिक किनार आहे त्याचप्रमाणे मराठवाड्यातील या नव्या मेळाव्यांसही एक सामाजिक चेहरा आहे.गोपीनाथ मुंडे हे भाजपचे एक ज्येष्ठ नेते. 'सोशल इंजिनीअरिंग' हा शब्दही जेव्हा जन्माला आलेला नव्हता तेव्हा संघातील वसंतराव भागवत यांच्या मुशीतून घडलेले मुंडे हे राज्यातील सर्वात प्रबळ 'ओबीसी' चेहरा होते. त्यांच्या निधनाने भाजपपेक्षाही अधिक नुकसान 'ओबीसी' समाजाचे झाले. मुंडे आणि दुसरे प्रबळ 'ओबीसी' नेते छगन भुजबळ यांच्यात एक 'सामाजिक' सख्य होते. पक्ष भिन्न. पण समाजाच्या बंधाने हे दोन्हीही नेते बांधलेले होते आणि शक्यता ही की मुंडे हयात असते तर या उभयतांची एक आघाडी जन्मास येती. मुंडे गेले आणि ते राहिले. त्यात त्यांचा पुतण्या धनंजय यानेही काका हयात असतानाच त्यांचा हात सोडला आणि कन्या पंकजा यांना भाजपत फटके बसल्यानंतर वडिलांच्या सामाजिक वारशाची आठवण झाली. 'सांगे वडिलांची कीर्ती' त्यांस नव्या भाजपत पुरेशी ठरली नाही. तेव्हा त्यांनी वडिलांच्या सामाजिक वारशास हात घातला आणि स्वत:चा वेगळा विजयादशमी मेळा भरवणे सुरू केले. अन्य कोणत्याही अशा मेळाव्याप्रमाणे शक्तिप्रदर्शन हाच त्याच्या मेळाव्याचाही हेतू होता. त्यात गैर काही नाही. तथापि त्यांच्या यंदाच्या मेळाव्यास ताज्या लोकसभा निवडणुकीतील पराभवाच्या भळभळत्या जखमेची पार्श्वभूमी होती. हा पराभव अन्य कोणत्याही पराजयाप्रमाणे सरळ नव्हता. त्यास सामाजिक किनार होती. 'ओबीसी' गोपीनाथरावांनी आपल्या हयातीत मराठा कार्ड उत्तम जोपासले. त्यामुळे शेजारील मतदारसंघातील काँग्रेसी मराठा विलासराव देशमुख आणि भाजपीय 'ओबीसी' मुंडे हे परस्परपूरक साथीदार होते.

# विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हाच ध्यास!

## डॉ.आदित्य सारडा :आदित्य शिक्षण संस्थेत टर्फ मल्टि स्पोर्ट कॉम्प्लेक्स

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

आदित्य शिक्षण संस्थेत विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण आणि तज्ज्ञ प्राध्यापकांकडून होत असलेल्या ज्ञानार्जनामुळे आज आदित्य शिक्षण संस्थेचे विद्यार्थी अटकेपार झेंडा लावत आहेत. कृषी, शिक्षण, आरोग्य, आयटी, क्रीडा अशा विविध क्षेत्रात अधिकारी म्हणून येथील विद्यार्थी दिसतात याचा अभिमान वाटतो. विद्यार्थ्यांनी येथे मिळणाऱ्या सर्व सुविधांचा लाभ घेऊन आपले आणि आपल्या आई–वडिलांचे नाव मोठे करावे. त्यातून आदित्य शिक्षण संस्थेचे नावही देशाच्या कानाकोपऱ्यात आणि परदेशात अभिमानाने घेतले जाते. असे प्रतिपादन आदित्य शिक्षण संस्थेचे संचालक डॉ.आदित्य सुभाषचंद्र सारडा यांनी केले.

सीए गिरीश गिल्डा यांच्या संकल्पनेतून शहरातील आदित्य शिक्षण संस्थेत टर्फ मल्टि स्पोर्ट कॉम्प्लेक्स उभारण्यात आले आहे. याचे उदघाटन मंगळवार १५ ऑक्टोबर रोजी डॉ. आदित्य सारडा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा व संतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्य तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

पुढे बोलताना डॉ. आदित्य सारडा म्हणाले की, आदित्य शिक्षण संस्थेची शिक्षण क्षेत्रामध्ये यशाची परंपरा कायम आहे. भविष्यातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वतोपरी मदत केली जाणार आहे. त्याचाच एक भाग म्हणून आज टर्फ मल्टिस्पोर्ट कॉम्प्लेक्स चे उद्घाटन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या मल्टि स्पोर्ट कॉम्प्लेक्सचा जास्तीत जास्त फायदा घेऊन आपला सर्वांगीण विकास करावा व आपल्या पालकांचे नाव मोठे करावे जेणेकरून संस्थेचे नाव देखील मोठे होईल. मला अभिमान आहे. आपल्या संस्थेतील विद्यार्थी विविध क्षेत्रात करिअर करतांना अनेक संस्थेत नेतृत्व करतात. तर शासकीय सेवेत चांगल्या पदावर अधिकारी आहेत. या पुढेही आपल्या संस्थेतून मोठ–मोठ अधिकारी घडावेत यासाठी संस्थेच्या शिक्षणाचा दर्जा अधिकाधिक उंचावला जाईल त्यासाठी लागेल ती मदत सातत्याने पुरवण्यात येईल असेही डॉ. आदित्य सारडा यावेळी म्हणाले.कार्यक्रमाला आदित्य शिक्षण संस्थेतील प्राचार्य डॉ.कल्याण अपेट, प्राचार्य शाम भुतडा, प्राचार्य डॉ. सतीश कचरे, प्राचार्य कडू, प्राचार्य डॉ. विकास गर्जे, प्राचार्य बहिरवाल, प्राचार्य लहुजी हिंगणे, प्राचार्य डॉ. हिमांशू श्रीवास्तव यांच्यासह सर्व महाविद्यालयाचे प्राध्यापक कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदित्य नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य डॉ. विकास गर्जे यांनी तर आभार आदित्य अन्न तंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम भुतडा यांनी मानले.



### १०० बाय ८० चे प्रशस्त टर्फ मल्टि स्पोर्ट कॉम्प्लेक्स

आदित्य शिक्षण संस्थेच्या बी कॅम्पस मध्ये तब्बल १०० बाय ८० चे प्रशस्त टर्फ मल्टि स्पोर्ट कॉम्प्लेक्स उभारण्यात आले असून त्याचे मंगळवारी उद्घाटन झाले. यामध्ये विद्यार्थ्यांना डे–नाईट क्रिकेट, फुटबॉल, बॅडमिन्टन, हॉलीबॉल, हँडबॉल खेळता येणार आहे. सर्व बाजूंनी जाळ्या बसवण्यात आल्या असून आत्याधूनीक पध्दतीने येथे विद्यार्थ्यांसाठी टर्फ मल्टि स्पोर्ट कॉम्प्लेक्स उभारण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांसाठी टर्फ मल्टि स्पोर्ट कॉम्प्लेक्स उपलब्ध करूण देणारी आदित्य शिक्षण संस्था मराठवाड्यात एकमेवशहरातील आदित्य शिक्षण संस्था विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कायम तत्पर असते. शिक्षक, विद्यार्थी यांनी मागणी करण्यापूर्वीच आपल्या संस्थेतील विद्यार्थ्यांना काय हवे काय नाही. याकडे संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालक आदित्य सारडा, आदिती सारडा यांचे प्रत्येक गोष्टीकडे बारीक लक्ष असते. त्यामुळेच येथील विद्यार्थी प्रत्येक क्षेत्रात आज अटकेपार झेंडा लावत आहेत. आदित्य शिक्षण संस्था ही मराठवाड्यातील एकमेव संस्था आहे. जिने विद्यार्थ्यांसाठी टर्फ मल्टि स्पोर्ट कॉम्प्लेक्स उपलब्ध करून दिले आहे.

## पान एक वरून

पान एक वरून

### 'RSS'वर कॅनडामध्ये

कोणतीही कारवाई झालेली नाही. हे दुर्दैवी आहे. आम्ही कॅनडातील प्रत्येक नेत्याला विनंती करतो, त्यांनी या कृत्यासाठी नरेंद्र सरकारला जबाबदार धरावे. तसेच त्यांना जाब विचारावा. कॅनडाच्या नागरिकांची सुरक्षा सुनिश्चित करणं, ही न्यू डेमोक्रॅटिक पार्टीची प्राथमिकता आहे, अशी प्रतिक्रियाही त्यांनी दिली. दरम्यान, खलिस्तानी दहशतवादी हरदीपसिंग निज्जर याच्या हत्येमागे भारताचा हात असल्याचा आरोप कॅनडाने वर्षभरापूर्वी केला होता. मात्र, भारताने कॅनडाचे आरोप फेटाळून लावले होते. अशातच कॅनडाने पुन्हा एकदा या प्रकरणाचा उल्लेख करत भारतीय उच्चायुक्त संजय कुमार वर्मा आणि इतरांचा या प्रकरणाच्या तपासात सहभाग असल्याचा आरोप केले. याचा प्रत्युत्तर म्हणून भारताने कॅनडाच्या उच्चायुक्तांसह ६ राजनैतिक अधिकाऱ्यांना भारत सोडण्याचे आदेश जारी केले. तसेच कॅनडातील भारताच्या राजनैतिक अधिकाऱ्यांनाही परत बोलवले. यामध्ये कार्यवाहक उच्चायुक्त स्टीवर्ट रॉस व्हीलर, उपउच्चायुक्त पॅट्रिक हेबर्ट, प्रथम सचिव मेरी कॅथरीन जोली, प्रथम सचिव लॅन रॉस डेव्हिड ट्राइट्स, प्रथम सचिव डम जेम्स चुइप्का, प्रथम सचिव पॉला ओरजुएला यांचा समावेश आहे. त्यांना १९ ऑक्टोबर २०२४ रोजी पर्यंत भारत सोडण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

### कोरियाला जोडणारा रस्ता केला

या दोन्ही देशांनी एकमेकांना युद्धाची धमकीव दिल्यामुळे दोन्ही देश युद्धाच्या उंबरठ्यावर असल्याची परिस्थिती आहे.दरम्यान, दक्षिण कोरियाबरोबरच्या सर्व सीमा उत्तर कोरियाने पूर्णपणे बंद करण्याची घोषणा उत्तर कोरियाचे अध्यक्ष किम जोंग उन यांनी केली आहे. तसेच उत्तर कोरियाच्या सैन्याने सांगितलं आहे की, दक्षिण कोरियाकडे जाणारे सर्व रस्ते आणि रेल्वे मार्ग बंद करण्यात येणार आहेत. त्यामुळे दोन्ही देशातील तणाव आणखी वाढण्याची शक्यता आहे.

### बीडच्या खासदारांचे मुख्यमंत्र्यांना

लक्षात घेता, त्यांची मागणी योग्य आणि रास्त आहे.त्यामुळे 'मुख्यमंत्री' युवा कार्य प्रशिक्षण योजनेचा कालावधी पूर्ण होण्यासाठी संबंधित विभागास आदेशीत करावे.असे पत्र खा.बजरंग सोनवणे यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिले आहे.

### महाराष्ट्रात निवडणूक

पर्यंत उमेदवार आपला उमेदवारी अर्ज मागे घेऊ शकणार आहेत, अशी माहिती निवडणूक आयुक्तांनी दिली आहे. २५ नोव्हेंबरपर्यंत निवडणुकीचा कार्यक्रम पूर्ण होणार आहे. दरम्यान, महाराष्ट्रातील विधानसभेची मुदत २६ नोव्हेंबर रोजी संपणार आहे. तर ४ जानेवारी २०२५ पर्यंत झारखंड विधानसभेची मुदत आहे. सणासुदीच्या काळात कोणत्याही निवडणुकांची घोषणा केली जात नाही. यंदा दिवाळी २९ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत आहे. त्यामुळे दिवाळीनंतर २० नोव्हेंबर रोजी महाराष्ट्रात विधानसभा होणार असून यंदा महाराष्ट्रात एकाच टप्प्यात निवडणुका होणार आहेत.

### हरियाणापासून शिका, पाय

हरियाणाच्या निकालातून शिका आणि महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्यावेळी पाय जमिनीवर ठेवा असं बजावलं आहे अशी माहिती समोर आली आहे. अतिआत्मविश्वासामुळे सत्ता हातातून जाते, महाराष्ट्राच्या बाबतीत ही चूक करु नका. हरियाणात दुधाने पोळल्याने आता राहुल गांधींनी महाराष्ट्रातल्या नेत्यांना ताकही फुंकून पिण्याचा सल्ला दिल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होते आहे. तसंच प्रत्येक पाऊल उचलताना काळजी घ्या असंही राहुल गांधींनी या बैठकीत बजावल्याचं कळतं आहे.महाराष्ट्रात महाविकास आघाडी आहे ज्यामध्ये शिवसेना (उद्धव ठाकरे), काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) हे तीन पक्ष एकत्र आहेत. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीने चांगली कामगिरी केली आहे. महाराष्ट्रातल्या ४८ जागांपैकी ३१ जागा महाविकास आघाडीला मिळाल्या आहेत. लोकसभेत चांगलं यश मिळाल्याने महाविकास आघाडीचा आत्मविश्वास दुणावला आहे. मात्र राहुल गांधींनी आता महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हुरळून न जाण्याचा आणि हरियाणाच्या निकालातून शिकण्याचा सल्ला दिला आहे.

### मोसमी पावसाची देशातून

हरियाना, दिल्ली, हिमाचल प्रदेशातून मोसमी पाऊस माघारी फिरला होता. पाच ऑक्टोबरपर्यंत महाराष्ट्रातील नंदूरबार जिल्ह्याच्या उत्तर भागातून परतीचा प्रवास सुरू झाला होता. ईशान्य भारतासह उत्तराखंड, बिहार, ओदिशा, पश्चिम बंगाल, झारखंडच्या काही भागातून १३ ऑक्टोबरपर्यंत मोसमी पाऊस माघारी परतला तर मंगळवारी (१५ ऑक्टोबर) महाराष्ट्रासह संपूर्ण देशातून मोसमी पाऊस परतला आहे. यंदा दरवर्षी सहा दिवस अगोदरच दोन जुलै रोजी मोसमी वाऱ्यांनी सर्व देश व्यापला होता.राज्यात सामान्यपणे जून ते सप्टेंबर या चार महिन्यांच्या काळात मोसमी पाऊस हजेरी लावतो. असे झाले तर मोसमी पावसाचे वर्तन नैसर्गिक व सुयोग्य समजले जाते. असे झाल्यास परतीचा पाऊस, मार्चच्या मध्यापर्यंत थंडी, बंगालच्या उपसागरात अधिक व अरबी समुद्रात कमी संख्येने होणारी चक्रीवादळे, कमी गारपीट व माफक धुके, थंडीतील भू–दवीकरण व भू–स्फटिकिकरण, असे सुयोग्य वातावरणीय बदल निसर्ग चक्रानुसार घडतात. जे शेतीसाठी उपयोगी ठरतात, अशी माहिती निवृत्त हवामान शास्त्रज्ञ माणिकराव खुळे यांनी दिली.

### विमानांना बॉम्बने उडवण्याची

.एअर इंडियाच्या माहितीनुसार, १५ ऑक्टोबर २०२४ रोजी एअर इंडियाच्या दिल्ली ते शिकागो (–ख १२७) या विमानाला धमकी आली होती. त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षेच्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर आणि खबरदारीचा उपाय म्हणून हे विमान कॅनडातील इक्लुइट विमानतळावर उतरवले. त्यानंतर विमान आणि प्रवाशांची सुरक्षा प्रोटोकॉलनुसार तपासणी करण्यात आली. तसेच एअर इंडियाने प्रवाशांना त्यांचा प्रवास पुन्हा सुरू होईपर्यंत मदत करण्यासाठी विमानतळावर एजन्सी सक्रिय केल्या, असं एअर इंडियाकडून सांगण्यात आलं.दरम्यान, विमानांना अशा प्रकाराच्या धमक्या आल्यानंतर चौकशी करण्यात आली असता या सर्व धमक्या एकाच व्यक्तीने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवरून दिल्याची माहिती समोर आली. मात्र, या धमक्या खोट्या असल्याचंही सांगितलं जातं आहे. दरम्यान, यामुळे शेकडो प्रवाशांना अडचणींना समारे जावे लागले. यासंदर्भातील वृत्त हिंदुस्तान टाईम्सने दिलं आहे.

### उर्दू घर उभारुन बाबा सिद्दीकींचे

दाखविले आहे. मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळासह अल्पसंख्यांकाच्या विविध योजनांसाठी कोट्यवधींची तरतूद महायुती सरकारने केली आहे. त्यामुळे समाजाचे खरे हितचिंतक कोण आहेत, हे ओळखण्याची गरज आहे. उर्दू घरासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. येत्या वर्षभरात उर्दू घर उभारून त्याला दिवंगत नेते बाबा सिद्दीकी यांचे नाव दिले जाईल. तसेच, अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मुस्लिम मुलींच्या वसतिगृहाचाही प्रश्न सोडविला जाईल, अशी ग्वाही डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली. याप्रसंगी मुफ्ती मोहीयोद्दीन साहाब, मौलाना मुख्तार साहब, मौलाना सद्दर, हाफिज नदीर, हाफेज नजमुद्दीन साहाब यांच्यासह माजी नगरसेवक, मुस्लिम समाजातील प्रतिष्ठित नागरिक व मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान सहा वरून

पान सहा वरून

### पालकमंत्र्यांकडून दहशतीला

पाळलेल्या गावगुंडांनी घडवून आणला असून, मतदारसंघात दहशतीचे वातावरण निर्माण करण्याचा त्यांचा हेतू आहे. त्यांच्या असल्या तुघलकी कारभाराला जनता कंटाळून गेली असून आगामी विधानसभा निवडणुकीत त्यांना थारा मिळणार नाही. त्यामुळे त्यांच्या पायाखालची जमीन सरकली आहे. याच मानसिकतेतून पालकमंत्र्यांचे कार्यकर्ते लोकांना दबावाखाली आणत आहेत. यापुढेही त्यांच्याकडून अनेक गैरकृत्ये होण्याची शक्यता असल्याने प्रशासनाने यावर अंकुश घालावा अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवा नेते राजेभाऊ फड यांनी केली आहे.

### सामाजिक ऋणानुबंधातून

बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नंदू कराडे, नारायण बळी, किसन पाटील, लिंबाजी पांडव, किशोरभाऊ गारोळे, संदीप गारोळे, ॲड दीपक मापारी, गजानन जाधव, परमेश्वर दहातोंडे, लुकमान कुरेशी, इक्बाल कुरेशी, सय्यद उमर, श्रीकांत मादनकर, गणेश सवडतकर, यांच्यासह मोठ्या संख्येने शुभेच्छा देणारे व डॉ. बछिरे यांच्यावर प्रेम करणारे शुभेच्छा देणारे उपस्थित होते.

### आचारसंहिता, विकास कामांचा

तालुक्याचा विकास झाला. काही दिवसापूर्वी मी निवडणूक लढवणार नाही असे उद्गार आमदार लक्ष्मण पवार यांनी काढले होते. यानंतर सर्व सामान्य नागरिकांमधील व कार्यकर्त्यांमधील तळमळ पाहायला मिळाली अनेकांच्या डोळ्यांमधून अश्रू निघाले. कारण विकास तर होतच होता पण भावा–भावामधील, गावागावा मधील भांडणे थांबली होती. यासाठी पुन्हा एकदा लक्ष्मण पवार आमदार व्हावा ही सर्वसामान्य जनतेने स्वप्न पाहिले, यासाठी गोरगरीब दीनदुबळा कार्यकर्ता आमदारांच्या दारात येऊन आपण निवडणूक लढवावी यासाठी टाहो फोडत होता. कार्यकर्त्यांच्या आग्रहानंतर आमदार लक्ष्मण पवार ही भूमिका नक्कीच बदलतील अशी आशा सर्वांना असून यावेळेस आमदारकीची हॅट्रिक नक्कीच करतील. हे करत असताना युवकांच्या गळ्यातील ताईत युवा नेते शिवराज पवार हे आमदार लक्ष्मण पवार ज्या ठिकाणी पोहोचू शकत नाही अशा ठिकाणी पोहोचून लोकांच्या अडचणी जाणून घेत आहे. दिनांक २ ऑक्टोबर पासून रोज कोटी रुपयांमध्ये उद्घाटने चालू होते. पंधरा दिवस झाले रोज कोट रुपयांचे उद्घाटन पहिल्यांदाच मतदारसंघाने पाहिला असेल. आचार संहिता जर लागली नसती तर हे उद्घाटन आणखी देखील थांबली नसते अशी चर्चा सर्वसामान्य मधून होत आहे.

**खेळातही करिअरच्या नामी**...उपसरपंच बिभीषण बडे तसेच गावंदरा शाळेतील शिक्षक मुंडे सर, चौधरी सर, सीताप सर मुंडे मॅडम, फरताडे मॅडम, मोत्तेवार मॅडम यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेछया दिल्या.त्याचे कुस्ती कोच अनिकेत गोरे आम्हाला क्रीडा मार्गदर्शक म्हणून लाभलेले घुले सर व त्याचे वडील सुरेश कांबळे यांचे पण अभिनंदन केले.

### क्रीडा संकुल उभारणीचा

यांच्या मागणीनुसार भव्य क्रीडा संकुल अद्ययावत सोयी–सुविधांसह उभारले जावे यासाठी मागील वर्षी छत्रपती संभाजीनगर येथे पार पडलेल्या मंत्रिमंडळ बैठकीत १९ कोटी ७५ लाख रुपयांच्या आराखड्यास याआधीच मान्यता देण्यात आलेली आहे, त्यामुळे क्रीडा संकुल उभारणीसाठी पुरेसा निधीही उपलब्ध आहे. जिल्हाधिकारी बीड यांचे मार्फत सदर जमीन क्रीडा विभागास हस्तांतरित करून उभारणीबाबतची पुढील कार्यवाही तातडीने सुरू करावी असे निर्देश धनंजय मुंडे यांनी संबंधितांना दिले आहेत. तसेच या निर्णयाबद्दल श्री मुंडे यांनी उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभारही व्यक्त केले आहेत.

### सामाजिक दायित्वातून राबविला

आहे तरी सर्व ,एस.टी. चालक, वाहक व इतर कर्मचारी यांनी या शिबीराचा लाभ घ्यावा असे आव्हान दोन्ही संघटनाच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

### सराफा दुकानातून सोने

सुधाकर देशमुख यांनी तात्काळ त्या बॉक्सचे वजन केले असता ते कमी भरल्याने त्यांना चोरी झाल्याचे लक्षात आले. बाहेर येऊन पाहू पर्यन्त चोरटे आपल्या साथीदारांसह दोन मोटर सायकलवर पसार झाले होते.या घटनेनंतर त्यांनी तात्काळ शहर पोलीस स्टेशनला सर्व प्रकार सांगून व घटनेचे व्हिडिओ पोलिसांना सुपूर्द केले व तक्रार दाखल केली या प्रकरणी पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांच्या मार्गदर्शनाखाली बीट अंमलदार तळेकर हे तपास करत आहेत या घटनेमुळे सराफा बाजारात खळबळ उडाली आहे.

### बेशिस्त कारभाराला

आणण्यासाठी मोठे काम करण्याचे आव्हान आहे. दि. १५ ऑक्टोबर रोजी अशोक राठोड यांनी गटविकास अधिकारी पदाचा कार्यालयामध्ये पदभार स्वीकारल्यानंतर अनेक कर्मचारी, अधिकारी, कंत्राटी, कर्मचारी, शेतकरी, लाभार्थी यांच्यावतीने पुष्प देऊन सत्कार करण्यात आला.

**सहाय्यक कार्यक्रम अधिकारी जोगदंड यांचा बोलबाला** : नरेगा सहाय्यक कार्यक्रम अधिकारी म्हणून गणेश जोगदंड हे काम पाहत असून गेल्या अनेक दिवसापासून पंचायत समितीच्या कारभारामध्ये त्यांचे नाव चर्चेत आहे. कुठलाही लाभार्थी काम घेऊन गेला तो रिकाम्या हाती परत न येता त्याचे काम करण्याची हातोटी गणेश जोगदंड यांच्यामध्ये असून याचा फायदा नवनियुक्त गटविकास अधिकारी राठोड यांना होणार आहे. नरेगा मधील विविध योजना तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी सहाय्यक कार्यक्रमाधिकारी जोगदंड यांची सतत तळमळ असते कार्यालयात कमी वेळ असले तरी फिल्डवर जास्त लक्ष देण्यावर त्यांचा भर असतो. गटविकास अधिकारी अशोक राठोड यांनी पदभार स्वीकारताच त्यांचा सत्कार सहाय्यक कार्यक्रम अधिकारी गणेश जोगदंड यांच्यावतीने करण्यात आला

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# पोखरा योजनेमुळे शेतकऱ्यांचं भलं!

**धोरण** पोखरा योजनेत २१ गावे समाविष्ट

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

नानाजी देशमुख कृषी संजीवनी या शासनाच्या महत्व कांक्षी योजनेचा टप्पा क्र, दोन साठी सोयगाव तालुक्यातील २१ गावांची घोषणा मंगळवारी दुपारी एक वाजता विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता जाहीर होण्याच्या चार तास आधी करण्यात आली परंतु यातून बनोटी मंडळातील गावांना बगल देत वगळण्यात आल्या मुळे शेतकऱ्यांचा तीव्र संताप पहावयास मिळाला होता

सोयगाव शहरासह बनोटी मंडळातील ४३ गावाना वगळून केवळ सिल्लोड विधानसभा मतदार संघात असलेल्या २१ गावांना या महत्त्वकांक्षी योजनेत स्थान मिळाले आहे जरंडी, माळेगाव, पिंपरी, कंकराळा,रावेरी, सोनासवाडी,गलवाडा,आमखेडा,वरखेडी(खु) ,पळस खेडा, धनवट,जंगलातांडा,फरदापुर, चोंडेश्वर,वरखेडी(बु),ठाणा, मोलखेडा, राकसा,हिंगणा,जामठी या २१ गावांचा समावेश करण्यात आला आहे यामधील आमखेडा, गलवाडा,माळेगाव,पिंपरी, कंकराळा,सोनस वाडी,ही सहा गावे सोयगाव महसूल मंडळातील असून सोयगाव शहराची वगळणी करण्यात आली आहे तर जरंडी, रावेरी,ही दोनच गावे जरंडी मंडळातील असून उर्वरित११ गावे ही सावळद बारा मंडळातील आहे मात्र या योजनेत बनोटी मंडळ पूर्णपणे वगळण्यात आले आहे त्यामुळे शासनाच्या विरुद्ध शेतकऱ्यांचा संताप व्यक्त होत आहे या मंडळात आधीच शेतकऱ्यांचे अतिवृष्टीमुळे मोठं नुकसान झालेलं असताना या भागात हा सूक्ष्म सिंचनाचा प्रकल्प राबविणे गरजेचे असून मात्र याच मंडळाला या नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पातून बाद ठरविण्यात आले आहे



### योजना ठरणार औट घटकेची

दरम्यान या योजनेचा गावांची घोषणा होताच दुसरीकडे मात्र सायंकाळी विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता जाहीर झाली आहे त्यामुळे या योजनेच्या अंमलबजावणी साठी ग्रामसमिती गठित करता येणार नसून शिवार फेऱ्या ही होणार नाही निवडणुका होईपर्यंत ही योजना राबविता येणार नसल्याने घोषणा होताच ही योजना तीन महिने कागदावरच राहणार आहे.

## सफाई कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्न मार्गी

**दिलासा:** बंद घंटा गाड्या पुन्हा धावणार



लोणार/पुण्यभूमी प्रतिनिधी

घंटा गाड्या वरील कर्मचाऱ्यांचे वेतन दोन महिन्या पासून थकित होते वारंवार मागणी करून ही वेतन मिळाले नसल्याने शहरातील कचरा संकलीत करणाऱ्या घंटा गड्यांची चाके चार दिवसांपासून थांबल्याने शहरात सनासुदीच्या काळात घानीचे साम्रज्य पसरले होतेपरंतु आज शिवछत्र मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष नंदकिशोर मापारी यांनी स्थानिक नगर पालिकेच्या मुख्याधिकारी विभा वराडे यांच्या दालनात बसून घंटा गड्यावरील चालकांच्या वेतनाचा प्रश्न सोडविन्याची मागणी केली तसेच शहरातील बंदावस्थेत असलेल्या हायमस्ट लाईट लवकर सुरु करण्याची मागणी केली.

यावेळी मुख्याधिकारी वराडे यानी तात्काळ कचरा संकलीत करणाऱ्या घंटा गाड्या वरील चालकांच्या प्रलंबित वेतनाच्या देयकावर स्वाक्षरी करून त्यांचा रखडलेला प्रश्न मार्गी लावला यामुळे शहरातील कचरा संकलीत करणाऱ्या गाड्यांची गेल्या चार दिवसापासून थाबलेली चाके आज पासुन पुन्हा धावनार आहे. यावेळी कचरा संकलीत करणाऱ्या घंटा गाड्यावरील सर्व चालक उपस्थित होते.यावेळी आरोग्य निरीक्षक साळवे साहेब,सह बांधकाम अभीयंता कुलकर्णी, पानीपुरवठा अधीक्षक संजय एनेवार, उपस्थित होते.

## शस्त्र परवाना जमा करण्याचे आवाहन

**निर्णय:** आचारसंहितेमुळे दिले आदेश

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

भारत निवडणूक आयोग यांनी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा कार्यक्रम दिनांक १५आक्टोबर २०२४ रोजी घोषीत केलेला आहे. त्याबाबतची आचारसंहिता दिनांक १५ऑक्टोबर २०२४ रोजी पासून लागू झालेली असून सदर निवडणूका शांततेने व खुल्या वातावरणात पार पाडण्याचे तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत उपाययोजना करणे आवश्यक आहे.

आदर्श आचार संहीतेमध्ये शस्त्र परवानाधारक यांचे परवान्यावरील मंजुर शस्त्र अनामत करणे बाबत निर्दे श असून या निर्देशामध्ये निवडणूका जाहीर झाल्यापासून शस्त्रास्त्रे बाळगण्यास निर्बंध घालण्यात आले असून त्यानुसार स्क्रिनिग समितीच्या बैठकीत शस्त्र परवानाधारक यांचे शस्त्र अनामत करणे बाबत छाननी करण्यात आली आहे.

बीड जिल्हयाची विधानसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४, शांततेने व खुल्या वातावरणात पार पाडण्यासाठी संपूर्ण जिल्हयातील शस्त्र परवानाधारकांनी शस्त्रे (बँका,महत्वाची कार्यालये,संस्था,विद्युत केंद्र व इतर महत्वाची कार्यालये यांच्याकडील शस्त्र परवान्यावरील शस्त्र वगळून) इतर शस्त्रधारकांनी शस्त्रे जमा करणे आवश्यक असल्याने सदरची शस्त्रे आचारसंहिता कालावधीसाठी जमा करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी केले आहे.

## वाचन प्रेरणा दिनानिमित्त ग्रंथप्रदर्शन

**उपक्रम :** वाडिया वाचनालयात जयंती

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

ए.एच. वाडिया सार्वजनिक वाचनालयात भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती व वाचन प्रेरणादिनी ग्रंथप्रदर्शन भरवण्यात आले होते. सर्वप्रथम डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या फोटो प्रतिमेस वार्षिक सर्वसाधारण सभेचे अध्यक्ष डॉ. विवेक पालवनकर यांच्याहस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.



यानंतर वाचनालयात भरवण्यात आलेले ग्रंथ प्रदर्शन वाडिया वाचनालयाच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष डॉ. अनुराग पांगरीकर, वार्षिक सर्वसाधारण सभेचे अध्यक्ष डॉ. विवेक पालवनकर, निमंत्रीत सदस्य श्री. मधुकरराव वैद्य यांच्या उपस्थितीत वाचकांसाठी खुले करण्यात आले. यावेळी वाचक विजय परदेशी, मुकुंद पाटील, प्रशांत बोंदार्डे, कदम राजेंद्र, मस्कर गणेश, कदम अजय, भागुराम जोगदंड, पवार सुंदर, पांडव भास्कर, कु. उनवणे प्रियंका, कु. दाताळ रोहिणी यांच्यासह ग्रंथपाल ग्रंथमित्र शेंडगे गणेश, सहा. ग्रंथपाल किशोर ठोसर, सहा. निर्गम कुमार देशमुख, लिपीक संतोष जगताप, शिपाई रामेश्वर जाधव, जोशी रमेश आदीसह वाचक, सभासद उपस्थित होते. आदी उपस्थित होते.वाचनालयामध्ये वाचन प्रेरणादिनानिमित्त निरनिराळ्या ग्रंथाचे प्रदर्शन भरविण्यात आले. सदरील प्रदर्शन दिवसभर सकाळी ८.०० ते रात्री ८.०० या वेळेत वाचकांसाठी खुले करण्यात आले होते. याचा वरील सर्व मंडळीसह असंख्य वाचक आणि सभासद यांनी लाभ घेतला.

## कविता बागल यांचे निधन

गंगामसला/पुण्यभूमी प्रतिनिधी



माजलगाव तालुक्यातील छोटेवाडी येथील सौ.कविता मधुकर बागल यांचे दि.१४ आक्टोंबर सोमवार रोजी सकाळी ६ वाजता मोटरसायकल आपघाताने दुःखद निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ४५ वर्ष होते. त्यांच्या पार्थिवावर दि. १४ आक्टोंबर सोमवार रोजी दुपारी २ वाजता छोटेवाडी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनाने छोटेवाडी गावावर शोककळा पसरली आहे. मधुकर बागल यांच्या त्या पत्नी होत.

## निधी चालतो मंग नाव का नको!

**प्रा.सनी वाघमारे :** मागासवर्गीयांचा निधी पळविला

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

शहरातील प्रभाग क्रः- २ मोंढा रोड गेल्या अनेक वर्षापासून सदरील रस्ताची अवस्था अत्यंत वाईट परस्थिती झाली आहे .मोंढा रोड हा कृषी उत्पन्न बाजार समिती ,एम.आय.डि.सी, खंडेश्वरी मंदिर देवस्थान अनेक ठिकाणी हा रस्ता जोडला आहे.बीड जिल्हा प्रशासनाने लोकाच्या हिताच्या प्रश्न सोडवून या संकटातून मुक्त केले आहे.याबाबत मी बीड जिल्हा प्रशासनाची मनः पुर्वक आभार व्यक्त करतो. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार सन २०२४-२५ योजनेतून प्रभाग क्रः- २ मोंढा रोड शिव-शारदा बिल्डिंग ते जिजामाता चौक ते संत सावतामाळी चौक ते अमरधाम स्मशानभूमी पर्यंत रस्त्याच्या कामासाठी ४ कोटी २० लाख रुपये निधी देण्यात आला.सदरील काम हे समर्थ कन्ट्रक्शनचे ठेकेदार पाठक नामक व्यक्तीला देण्यात आला.

परंतु लोकशाहीर अण्णाभाऊ साठे दलित वस्ती सुधार योजना नावाचा बोर्ड लावण्यास बीड नगर परिषदचे मुख्यधिकारी व बांधकांम अभियंता यांना का विसर पडला. का जाणीवपुर्वक नावाचा बोर्ड टाळण्यात आला ? याठिकाणी मा.मुख्यधिकारी साहेब,बांधकांम अभियंता साहेब ,पाठक नामक ठेकेदार साहेब यांचा जो काही हेतू असेल तो मी याठिकाणी साध्य होऊ देणार नाही. मा.मुख्यधिकारी साहेब,बांधकांम अभियंता साहेब याप्रकाराला खतपाणी घालत तर नाहीत ना ? मी या प्रसिध्दातून माध्यमातून संबंधित अधिकारी व ठेकेदारास विनंती करतो की, आपण दोन दिवसात तीन ठिकाणी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे दलित वस्ती सुधार योजने नावाचा बोर्ड लावण्यात यावा. अन्यथा मी बीड नगर परिषद कार्यालय येथे आंदोलन करणार आहे.

## बनोटी पट्ट्यात पुन्हा पाऊस

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

तालुक्यातील बनोटी पट्ट्यात मंगळवारी सायंकाळी पाच वाजता पुन्हा परतीच्या पावसाने हजेरी लावली होती बनोटी सह हनुमंत खेडा, मुखेड,वरठाण तिडका नांदगाव, नांदगावतांडा,घोसला,आदी भागात मंगळवारी पुन्हा पावसाने हजेरी लावली आहे

अर्ध्या तासापेक्षा अधिक वेळ झालेल्या या पावसामुळे कपाशीच्या झाडा वरील व वेचणी करून शेतीच्या बांधावर आणलेला कापूस भिजला आहे त्यामुळे या पट्ट्यात नैसर्गिक संकटामुळे शेतकऱ्यांच्या अडचणी वाढला आहे गेल्या पाच दिवसापासून सलग परतीच्या पावसाने थैमान घातले आहे त्यामुळे शेतकरी आता कंटाळले आहे दरम्यान सायंकाळी झालेल्या पावसाने सोयगाव-बनोटी रस्ता जलमय झाला होता रस्त्यावरील खड्ड्यात पाणीच पाणी साचले होते तर निम्म्याहून अधिक रस्ता पाण्याखाली गेला होता त्यामुळे वाहनधारकांना अडचणींचा सामना करावा लागला आहे.

## उदगीर पत्रकार साहित्य संमेलनात सन्मान

**अभिनंदनिय :** रवी उबाळेंचा होणार सन्मान

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

मराठी पत्रकार परिषदेशी संलग्न असलेल्या उदगीर तालुका पत्रकार संघाच्या वतीने मराठी पत्रकार साहित्य संमेलनाचे आयोजन येत्या २० ऑक्टोबर रोजी केले आहे..या साहित्य संमेलनात बीडचे युवा पत्रकार तथा दैनिक नवराष्ट्र चे ब्युरो चीफ रवी उबाळे यांचा सन्मान होणार आहे. या साहित्य संमेलनाला मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त एस. एम. देशमुख तसेच स्वागताध्यक्ष क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.



उदगीर येथे होणाऱ्या साहित्य संमेलनात बीडचे युवा पत्रकार रवी उबाळे यांच्यासह धुळ्याचे जेष्ठ पत्रकार गो .पी.लांडगे, परिषदेच्या महिला प्रदेशाध्यक्षा जान्हवी पाटील, मुंबई पत्रकार संघाचे अध्यक्ष दीपक कैतके यांचा सत्कार होणार असून त्यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. या पुरस्काराबद्दल चारही पुरस्कार विजेत्यांचे मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख किरण नाईक शरद पाबळे राज्याध्यक्ष मिलिंद आष्टीकर कार्याध्यक्ष शिवराज काटकर सरचिटणीस प्राध्यापक सुरेश नाईकवाडे कोषाध्यक्ष मन्सूर भाई शेख पुणे विभागाचे सचिव गणेश मोकाशी आदींनी अभिनंदन केले.

**डॉ.सतीश साळुंके** जिल्हा रुग्णालयात वाचन प्रेरणा दिन

## वाचनाच्या अभावाने समाज विस्कटून गेला

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

प्रेरणादायी वाचनाच्या अभावाने समाज विस्कटून गेला आहे. जीवनवादी विचार वाचनातून मिळतो. वाचाल तर जीवनाच्या संकटाशी लढण्यास प्रेरित व्हाल असे प्रतिपादन जेष्ठ साहित्यिक डॉ. सतीश साळुंके यांनी केले. बीड येथील शासकीय रुग्णालयाच्या नर्सिंग कॉलेजच्या वतीने आयोजित राष्ट्रपती एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले यावेळी डॉ. साळुंके बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रुग्णालयाच्या मेट्रेन रमा गिरी होत्या तर व्यासपीठावर प्राचार्य डॉ. सुवर्णा बेदरे व उपप्राचार्या शिला मोहिते उपस्थित होत्या. आरंभी सरस्वती पूजन करून दीप प्रज्वलन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाच्या वतीने पाहुण्यांचे शाल,बुके व एपीजे अब्दुल कलाम यांचे आत्मचरित्र अग्निपंख हे पुस्तक देऊन स्वागत करण्यात आले. तसेच उपस्थितांना फ्लोरेन्स



नाइटिंगेल यांची प्रतिज्ञा देण्यात आली.

आपल्या भाषणात साळुंके पुढे म्हणाले की, जीवनातील संकटांना व दुःखांना समोर जाण्याची ऊर्जा वाचनातून मिळते दर्जेदार वाचनाने दर्जेदार विचार निर्माण होतात. कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्राचार्या डॉ.सुवर्ण बेदरे यांनी केले. त्या म्हणाल्या एपीजे अब्दुल कलाम हे राष्ट्रीय प्रेरणास्थळ आहे. प्रतिकूल स्थितीवर मात करून वैश्विकस्तरावर त्यांनी देशाचे नाव उंचावले. मेट्रन रमा गिरी अध्यक्षीय समारोप करताना म्हटले की, चांगले आयुष्य जगण्यासाठी चांगले वाचन करायला हवे. प्रत्येकाने वाचन करणे गरजेचे आहे कारण वाचनातून संस्कार मिळतात. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रतीक जोशी यांनी केले तर आभार प्रा. श्रीपाल ससाणे यांनी मानले. यावेळी शिक्षक मुक्ता पवार, रोहन वाघमारे, उल्का साळवे तसेच एएनएम, जीएनएम, एलएचव्ही अभ्यासक्रमाचे विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते .

## परळी औष्णिक विद्युत केंद्रात जयंती!



परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

भारताचे मिसाईल मॅन तथा भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी. जे.अब्दुल कलाम यांची ९३ वी जयंती परळी औष्णिक विद्युत केंद्राच्या प्रशासकीय सभागृहात दि १५ ऑक्टोबर रोजी उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी परळी औष्णिक विद्युत केंद्राचे वरिष्ठ व्यवस्थापक वित्त व लेखा विभागाचे अरविंद येरणे यांच्या अध्यक्षतेखाली जयंतीचा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाच्या सुरुवातीस अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना वंदन केले. या प्रसंगी डॉ डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जीवनाविषयी प्रकाश टाकण्यात आला. या प्रसंगी मानव संसाधन विभागाचे विलास ताटे, सुरक्षा विभागाचे कुलकर्णी, अभियंता नंदकिशोर आंधळे, दीपक माने, अविनाश आचार्य, श्रीगणेश मुंडे, संजू मुंडे, भगवान साकसामुद्रे, के एच गित्ते मॅडम आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजू गजले यांनी केले तर उपस्थितांचे आभार सहाय्यक कल्याण अधिकारी शरद राठोड यांनी मानले.



## २६०० महिलांचा शिवसेनेत प्रवेश

**कल्याण :** शिवसेना पक्षात महिलांचे प्रतिनिधित्व दिवसेंदिवस वाढत असून, नुकताच २६०० हून अधिक महिलांनी पक्षात प्रवेश केला आहे. ठाणे, पालघर, उत्तर महाराष्ट्र आणि मुंबई या विभागात शिवसेनेत प्रवेश करणाऱ्या महिलांची संख्या लक्षणीय होती. लाडकी बहीण योजना ही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सुरू केलेली एक महत्वाकांक्षी योजना आहे, जी महाराष्ट्रातील माता आणि बहिणींच्या सक्षमीकरणावर केंद्रित आहे. या योजनेच्या माध्यमातून महिलांना आर्थिक मदत, सामाजिक सुरक्षेचे लाभ, तसेच विविध विकासात्मक कार्यक्रमांचे लाभ मिळण्यास प्रोत्साहन दिले जाते. शिवसेनेचा महिला वर्गात वाढता आधार शिवसेना पक्षाच्या नेतृत्वाने महिलांना सशक्त करण्याचे काम सातत्याने केले आहे. लाडकी बहीण योजनेच्या यशामुळे महिलांचे मोठ्या प्रमाणावर पक्षाकडे आकर्षण वाढले आहे. या योजनेतून महाराष्ट्रातील महिलांना भविष्याची नवी दिशा मिळत असून, पक्षाचा महिला वर्गातील आधार मजबूत होत आहे. म्हणूनच महाराष्ट्रातील विविध भागातील महिलांनी शिवसेनेमध्ये प्रवेश केला.

# ११ शासकीय रुग्णालयांना केंद्र, राज्य सरकारचा कायाकल्प पुरस्कार

### आरोग्य सेवेतील गुणवत्ता, सोयी-सुविधा उत्तम असल्याचे शासनाच्या पाहणीत निष्पन्न

◆ ठाणे (प्रतिनिधी):

रुग्णांना चांगल्या उपचाराबरोबर रुग्णालयात स्वच्छता नीटनेटकेपणा देखील महत्वाचा ठरत असून, ठाणे जिल्हा आरोग्य प्रशासनाने हीच कास धरली आहे आणि याचे फलित जिल्ह्यातील सिव्हिल हॉस्पिटल, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय आदी केंद्र आणि राज्य शासनाच्या परीक्षेत उत्तीर्ण ठरली आहेत. सरकारकडून शासकीय रुग्णालयाना कायाकल्प पुरस्कार देऊन गौरवण्यात येत असून यावर्षी जिल्ह्यातील १२ शासकीय रुग्णालयापैकी ११ रुग्णालयांना हा पुरस्कार नुकताच मिळाला आहे.

ठाणे जिल्हा शहरी, ग्रामीण अणि दुर्गम आदिवासी भागात विभागलेला आहे. त्यामुळे येथील आरोग्य चांगले रहावे यासाठी जिल्हा आरोग्य प्रशासन कायमच सतर्कतेने काम करताना दिसते. रुग्णांना चांगले उपचार मिळावेत हा कटाक्ष आरोग्य विभागाचा असला तरी येथील स्वच्छंदी वातावरण देखील महत्त्वाचं ठरत आहे. जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयाची नुकतीच तपासणी शासनस्तरावर झाली. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कैलास पवार, निवासी वैद्यकीय अधिकारी (बाह्यासंपर्क) डॉ. मृणाली राहुड यांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णालयामार्फत दिल्या जाणाऱ्या सोयी-सुविधांची दाखल केंद्र अणि राज्य सरकारने घेतली आहे. यावेळी शासकीय रुग्णालयांना केंद्र आणि राज्य शासनाकडून दिले जाणारे कायाकल्प पुरस्कारांमध्ये ठाणे जिल्ह्याला ११ पुरस्कार मिळाले आहेत.




उल्हासनगर येथील स्त्री रुग्णालयाने संपूर्ण राज्यातून तिसरा क्रमांक पटकावला आहे, तर २०२३-२४ च्या वर्षी सिव्हिल रुग्णालय ठाणे, पंडित भीमसेन जोशी रुग्णालय मीरा भाईदर, मध्यवर्ती रुग्णालय उल्हासनगर, सामान्य रुग्णालय मालवणी मालाड, स्त्री रुग्णालय उल्हासनगर , या रुग्णालयांना ३ लाखांचे पारितोषिक मिळाले आहे. उपजिल्हा रुग्णालय भिवंडी, उपजिल्हा रुग्णालय शहापूर, उपजिल्हा रुग्णालय बदलापूर, उपजिल्हा रुग्णालय अंबरनाथ, ग्रामीण रुग्णालय गोवेली, ग्रामीण रुग्णालय मुरबाड यांना एक लाख पारितोषिक म्हणून प्राप्त झाले आहे. यात प्रत्येक रुग्णालयातील वैद्यकीय अधीक्षक, वैद्यकीय अधिकारी, नर्सिंग स्टाफ, सफाई कर्मचारी यांचे मोलाचे योगदान आहे.जिल्हा गुणवत्ता आश्वासन समन्वयक डॉ. नेहा पेटकर, दक्षता मेंतोर डॉ. तेजस्विनी, प्रीतीश नर्स स्टाफ, सागर नर्स स्टाफ हे या जिल्हा गुणवत्ता टीमचे महत्त्वाचे घटक आहेत.

**- डॉ. मृणाली राहुड** (निवासी वैयकिय अधिकारी- बाह्य संपर्क)

सन २०१५ पासून स्वच्छ भारत अभियानांतर्गत कायाकल्प पुरस्कार सुरु करण्यात आली. आरोग्य सेवेतील गुणवत्ता व सोयी-सुविधा उत्तम करणे हे या योजनेचे उदिष्ट आहे. त्यात बाह्य परिसर स्वच्छता व सुशोभिकरण, जैविक घन कचरा व्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्थापन, आंतरिक स्वच्छता, निर्जंतुकीकरण, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची उपलब्धता तसेच रुग्णांचे अभिप्राय याबाबींवर मुल्यांकन गुण कायाकल्प अंतर्गत ठरविण्यात येतात.

**- डॉ. कैलास पवार** (जिल्हा शल्य चिकित्सक ठाणे)

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आदेश

# केडीएमटी कर्मचाऱ्यांसाठी जुनी पेन्शन योजना लागू



◆ कल्याण(वार्ताहर) :

केडीएमटीतील कर्मचाऱ्यांना अखेर पेन्शन लागू करण्यात आली आहे. परिवहन कामगार कर्मचारी संघटनेचे अध्यक्षांच्या प्रयत्नांना यश आले असून कामगारांकडून आनंद व्यक्त केला जात आहे. कल्याण-डोंबिवली परिवहन सेवा अर्थातच केडीएमटीच्या (कल्याण-डोंबिवली म्युनिसिपल ट्रांसपोर्ट) कर्मचाऱ्यांसाठी सन २००० नंतर केडीएमटीमध्ये रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याचे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्याने कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. परिवहन कामगार कर्मचारी संघटनेकडून खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून या मागणीसाठी पाठपुरावा सुरू होता.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या परिवहन सेवेत सन २००० नंतर रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन लागू करण्याला अखेर हिरवा कंदील मिळाला. परिवहन कामगार कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष रवी पाटील यांनी सततचा पाठपुरावा करीत राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन लागू करण्याचे आदेश देऊ केले. याबाबत केडीएमटी कर्मचाऱ्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांचे आभार व्यक्त केले आहेत. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या परिवहन सेवेत २००० नंतर रुजू होणाऱ्या कर्मचाऱ्यांना पेन्शन योजनेपासून रोखण्यात आले होते. याबाबत परिवहन कामगार कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष रवी पाटील गेल्या अनेक महिन्यांपासून या कर्मचाऱ्यांना पेन्शन मिळण्याकरिता प्रयत्नांची पराकाष्टा करीत होते. रवी पाटील यांनी पेन्शन योजना लागू होण्याकरता राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच कल्याणचे खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांच्याकडे सततचा पाठपुरावा केल्याने कर्मचाऱ्यांच्या पेन्शनचा प्रश्न अखेर निकाली काढला गेला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केडीएमटी कर्मचाऱ्यांकरिता २००० नंतर रुजू होणाऱ्या कर्मचाऱ्यांना पेन्शन मिळावी असा आदेश काढला असल्याची माहिती संघटनेचे अध्यक्ष रवी पाटील यांनी दिली आहे.

१९९९मध्ये कल्याण-डोंबिवली महापालिका परिवहन सेवेची स्थापन झाली. त्यामध्ये सन २००० नंतर कर्मचाऱ्यांची मोठ्या संख्येने चालक - वाहक पदांसाठी भरती झाली होती. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेल्या या महत्त्वपूर्ण आदेशाचा फायदा तब्बल ५५० कर्मचाऱ्यांना मिळणार असल्याची माहिती परिवहन कामगार कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष रवी पाटील यांनी दिली. गेल्या दोन दशकांहून अधिक काळापासून या कर्मचाऱ्यांचा जुनी पेन्शन योजना लागू करण्यासाठी लढा सुरू होता. तसेच जुनी पेन्शन योजनेसाठी पात्र असतानाही केडीएमटी प्रशासनाकडून चुकीच्या पद्धतीने त्यांना नव्या पेन्शन योजना लागू करण्यात आली. परिणामी कल्याण लोकसभेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्याकडे शासनाकडून न्याय मिळवून देण्यासाठी परिवहन कामगार कर्मचारी संघटनेचा अध्यक्ष या नात्याने आपण दाद मागितली होती. खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांनी याप्रश्नी राज्य शासनाकडे पाठपुरावा करत या ५५० कर्मचाऱ्यांवर पेन्शन योजनेबाबतचा अन्याय दूर केल्याची भावनाही पाटील यांनी व्यक्त केली आहे.

## वेचक

### दिवाळीआधी उजळणार फडके मैदान



**कल्याण :** कल्याण पश्चिमेतील प्रभाग क्रमांक २१ फडके मैदान व प्रभाग क्रमांक २२ शिवाजीनगर परिसरात विद्युत रोषणाईचे नवीन पोल बसविण्याच्या कामाचे भूमिपूजन शिवसेना उपशहर प्रमुख तथा माजी नगरसेवक मोहन उगले यांच्या हस्ते करण्यात आले. फडके मैदानमधील

**विद्युत पोलच्या कामाचे भूमिपूजन**

महाराष्ट्र नगर तसेच इतर परिसरामध्ये काही ठिकाणी असलेले विद्युत पोल हे कालबाह्य झाल्याने तसेच काही ठिकाणी नवीन पोल लावणे आवश्यक असल्याने नागरिकांच्या मागणीनुसार याठिकाणी ऊर्जाक्षम लाईटचे दिवे लावण्यात येणार असल्याने हे सर्व परिसर दिवाळीपूर्वी लख्ख प्रकाशाने उजळणार असल्याचे मोहन उगले यांनी सांगितले. या प्रसंगी विभाग प्रमुख अनंता पगार, शाखाप्रमुख शरद आव्हाड, उपशाखाप्रमुख गणेश आगळे, किरण जाधव, दीपक भालेराव, गणेश कुंभारकर, अक्की उगलमुगले, चंद्रकांत देशमुख, मोरे काका व परिसरातील नागरिक व महिला उपस्थित होते.

### सामुदायिक आरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद



**ठाणे :** उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विशेष वैद्यकीय मदत कक्षातर्फे राबविण्यात येणाऱ्या मोफत सामुदायिक आरोग्य शिबीराचे आयोजन अंजुमन खैरुल इस्लाम हायस्कूल, महागिरी कोळीवाडा येथे संपन्न झाले. या शिबिराचे आयोजन मा. नगरसेविका नम्रता कोळी व जयेंद्र कोळी यांच्यावतीने करण्यात आले होते. त्याप्रसंगी मान्यवर ठाणे शहर आमदार संजय केळकर कोकण पदवीधर आमदार निरंजन डावखरे ठाणे शहर अध्यक्ष संजय वाघुले मा. नगरसेवक संदीप लेले या शिबिरामध्ये तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी आणि रोग निदान आवश्यक रुग्ण शस्त्रक्रिया मोफत कान, नाक व घसा चिकित्सा नेत्ररोग चिकित्सा आयुष्मान भारत कार्डमोफत औषध रक्त व लघवी तपासणी मोफत ईसीजी हाडांच्या रोगांची चिकित्सा मोफत बालरोग चिकित्सा मोफत रक्त तपासणीमध्ये एकूण ५७ प्रकारच्या विशेष रोगांची चिकित्सा करण्यात आली.

### पाणी टंचाईप्रकरणी शिवसेनेने घेतली आयुक्तांची भेट



**कल्याण :** डोंबिवली पश्चिमेतील साईनगर येथील सर्व चाळींना व अनमोल नगरी मधील न्यू ओमकार, विघ्नेश पार्क, विघ्नहर्ता पार्क, साई भक्ती पार्क, शिवसाई दर्शन, मल्हार वेणू ह्या परिसरातील गेल्या दोन महिन्यांपासून कमी दाबाचा पाणीपुरवठा होत आहे. नागरिकांच्या या समस्येकडे पालिका प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आणि पाणीपुरवठा त्वरित सुरळीत चालू करण्याकरीता शिवसेना डोंबिवली शहर प्रमुख राजेश मोरे, उप शहरप्रमुख गोरखनाथ (बाळा) म्हात्रे, अनमोल म्हात्रे, कोरगांवकर, मालती पतंगे व इतर नागरिकांसह मिळून कल्याण-डोंबिवली महानगरपालिका आयुक्त इंदुराणी जाखड यांना पाणीपुरवठा पूर्ववत करण्यासाठी निवेदन देण्यात आले.

## तालुक्यातील शेतकरी बोनसपासून वंचित

**मुरबाड :** तालुक्यातील पाचशे शेतकऱ्यांचा मधील खरीप हंगामात पिकवलेला भात तालुका शेतकरी संघाने हमी भावात खरेदी केला. या वर्षासाठी शासनाने शेतकऱ्यांना वाढीव बोनस जाहीर केला होता; परंतु या पाचशे शेतकऱ्यांची नोंदणी ऑनलाईन सर्वर डाऊन असल्या कारणाने शासनाच्या रेकॉर्डला न येता ती रब्बी हंगामात झाली आणि हा बोनस फक्त खरीप हंगामासाठी दिला जाणार असल्याने हे पाचशे शेतकरी बोनसपासून वंचित राहीले. या शेतकऱ्यांवर शासनाने अन्याय करू नये यासाठी गेली तीन वर्ष शेतकरी रमेश हिंदुराव यांच्या नेतृत्वाखाली शासन दरबारी अंदोलन उपोषण करीत आहेत.

## 'आम्ही कला प्रतिष्ठान'तर्फे 'वाचन प्रेरणा दिन' साजरा

◆ ठाणे ( प्रतिनिधी):

भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त ठाण्यातील 'आम्ही कला प्रतिष्ठान' या सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, साहित्यिक उपक्रमात सक्रिय असणाऱ्या संस्थेने वाचन प्रेरणा दिनानिमित्त नुकतेच अभिवाचन स्पर्धेचे आयोजन केले होते.

पाचवी ते सातवी आणि आठवी ते दहावी अशा दोन गटात सुमारे ६० विद्यार्थी स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. ठाणे, मुलुंड, डोंबिवली, दादर, कळवा, ऐरोली, कल्याण येथील मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तीनही माध्यमातून शाळांमधील विद्यार्थ्यांनी 'निसर्ग', 'बदलता भारत', 'प्रवासवर्णन', 'विनोदी लेखन', 'शिक्षणाचे बदलते स्वरूप' आणि 'ऑलिम्पिकमधील भारत' या विषयांवरील लेखांचे, नाट्य उताऱ्यांचे, कवितांचे, प्रवास वर्णनाचे वाचन केले. ठाण्यातील शारदा विद्या मंदिर शाळेत झालेल्या या स्पर्धेचे उदघाटन सुप्रसिद्ध विधिज्ञ आणि प्रयास फाऊंडेशन या राष्ट्रीय सेवाभावी संस्थेचे पदाधिकारी ॲड. सुनील तिवारी यांनी केले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ सिने निर्माता-दिग्दर्शक अखिल देसाई, डॉ. अब्दुल कलाम कल्पकता केंद्र ठाणेचे प्रमुख पुरुषोत्तम पाचपांडे तसेच शारदा विद्यालयाचे वसतिगृह अधीक्षक ज्ञानेश्वर पाटील उपस्थित होते.



**६० शालेय विद्यार्थ्यांनी सादर केले अभिवाचन**

## बाळासाहेब ठाकरे मैदानात हायमास्टचे उद्घाटन

**कळवाः** महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या विशेष निधीमधून व शिवसेना उपनेते दशरथ पाटील यांच्या सहकार्याने व माझ्या विशेष प्रयत्नाने प्रभाग ९ ड मधील खारीगाव परिसरातील हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे क्रीडानगरी मैदानात नवीन हायमास्टचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी विभाग प्रमुख शाम पाटील, उपशहरप्रमुख राकेश पाटील, कळवा मुंब्रा विधानसभा संघटक रचनाताई पाटील, शाखाप्रमुख राधेय वराडकर, माजी नगरसेवक दिनेश कांबळे, किशोर देशमुख, बळीराम घाग, अरविंद कापडी, बाळकृष्ण म्हात्रे, भालचंद्र कडवे, शाखा संघटक निर्मला कदम, रेश्मा दळवी, फुटबॉल कोच संतोष पेडणेकर व इतर विद्यार्थी उपस्थित होते.

## कार्यकर्त्यांना धमकी देणाऱ्यांनी अपक्ष लढून दाखवा

### माजी मंत्री कपिल पाटील यांचे खुले आव्हान

बाळासाहेब भालेराव

**मुरबाड :** मुरबाडमधील भाजपाचे कार्यकर्ते व काही शेतकरी मंडळींना धमकी देणाऱ्यां प्रस्थापितांनी अपक्ष निवडणूक लढवावी असे आवाहन केंद्रीय पंचायतराज मंत्री कपिल पाटील यांनी माऊली सभागृहात आयोजित केलेल्या भाजपाच्या निष्ठवंत कार्यकर्ते मेळाव्यात केले. यावेळी सर्व मान्यवरांच्या हस्ते निष्ठावंत नेते व कार्यकर्त्यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर माजी आमदार कृष्णकांत तेलम, बदलापूर माजी नगराध्यक्ष रामभाऊ पातकर, ठाणे जिल्हा परिषद माजी सदस्य सुभाष घरत, ठाणे जिल्हा ग्रामीण भाजपा अध्यक्ष मधुकर मोहपे यांच्यासह अनेक मान्यवर तसेच हजारो निष्ठावंत कार्यकर्ते मोठ्या संख्येने तसेच महिला वर्ग उपस्थित होता.

पुढे बोलताना माजी केंद्रीय पंचायतराज मंत्री कपिल पाटील म्हणाले की लोकसभा निवडणुकीत माझा पराभव झाला; परंतु निष्ठावंतांनी चांगले काम केले ते



मला समोर दिसत आहेत; परंतु काही कार्यकर्त्यांना शेतकऱ्यांना लोकप्रतिनिधी धमक्या देत आहेत.

जर तुम्ही पक्षात राहून धमकी देत असाल, तर अपक्ष निवडणूक लढून दाखवावे असे माझे खुले आवाहन तुम्हाला आहे असे उद्गार कपिल पाटील यांनी माऊली सभागृहात काढले तसेच पुढे बोलतात त्यांनी सांगितले यापुढे शेतकऱ्यांच्या पाठीशी मी एक सामान्य कार्यकर्ता म्हणून उभा राहणार आहे म्हणून शेतकऱ्याला कोणी दमदाटी करत असेल, तर ते खपून घेतले जाणार नाही. मुरबाड-कल्याण राष्ट्रीय महामार्गाचे काम मंजूर करून मी आणले आहे.

तसेच मुरबाड रेल्वेचे कामही मी मंजूर करून आणले आहे. त्यामुळे यापुढे मी शेतकऱ्यांच्या पाठीशी उभा राहून मुरबाडसारख्या ग्रामीण भागात विकासाला पहिले प्राधान्य देण्यासाठी मी प्रयत्न करणार आहे म्हणून मी या निष्ठावंत कार्यकर्ता मेळाव्यात खुले आव्हान करतो की हिम्मत असेल तर अपक्ष निवडणूक लढवावी असे सूचक वक्तव्य केंद्रीय पंचायतराज मंत्री कपिल पाटील यांनी केले आहे.

## शहरातून स्पर्धा परीक्षेत मुलांनी पुढे या; पालिका आयुक्त अजय वैद्य यांचे आवाहन

◆ भिवंडी (वार्ताहर):

शहरातून स्पर्धा परीक्षेत मुलांनी पुढे येण्याचे आवाहन पालिका आयुक्त अजय वैद्य यांनी केले आहे. शहराची यंत्रमाग उद्योग नागरी म्हणून असलेली ओळख एक सुसंस्कृत शहर म्हणून करून देण्यासाठी उभारण्यात येत असलेली स्पर्धा परीक्षा, यूपीएससी व एमपीएससी अभ्यासिका ही शहरासाठी भूषणावह असेल असे प्रतिपादन भिवंडी पालिका आयुक्त तथा प्रशासक, कार्यक्रमाचे अध्यक्ष अजय वैद्य यांनी केले. ते भिवंडी महानगरपालिका पाणीपुरवठा निवासी वसाहत क्षेत्रात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना निधी अंतर्गत उभारण्यात येत असलेल्या यूपीएससी व एमपीएससी अभ्यासिका तसेच माजी सैनिकांसाठी कल्याण केंद्र व समाज केंद्र इमारतीच्या भूमिपूजन प्रसंगी बोलत होते.



या प्रसंगी व्यासपीठावर विधान परिषद आमदार एड. निरंजन डावखरे, आमदार महेश चौगुले, अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके, उपायुक्त शैलेश दोंदे यांसह विद्यार्थी, नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदरची स्पर्धा परीक्षा अभ्यासिका इमारत अवघ्या सहा महिन्यांत उभी राहणार असल्याने गरीब विद्यार्थ्यांना या अभ्यासिकेचा फायदा होणार असे प्रतिपादन शेवटी आयुक्त अजय वैद्य यांनी केले. नुकताच केंद्र सरकारने मराठी भाषेस अभिजात भाषेचा दर्जा दिला असल्याने या ठिकाणी उभारण्यात येणाऱ्या समाज मंदिरात मराठी व पाली भाषा अभ्यास केंद्र उभारण्यात यावे अशी सूचना केली. पालिका प्रशासनाकडे अभ्यासिका उभारण्यासाठी प्रस्ताव घेऊन गेल्यानंतर प्रशासनाने प्रस्ताव तातडीने बनवून शासनाकडे सादर केल्यानंतर सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी शासन पातळीवर हा प्रस्ताव तातडीने मंजूर करून यासाठी निधी उपलब्ध करून दिला. त्यामुळे अभ्यासिका उभारण्याचे स्वप्न साकार होत असल्याचे स्पष्ट करीत यासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व यंत्रणांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

## कल्याणमध्ये पार पडले इज ऑफ डुइंग बिझनेस सेमिनार

**कल्याण :** कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने इज ऑफ डुइंग बिझनेस सेमिनार कल्याणमध्ये नुकताच संपन्न झाला. बिझनेस सेमिनार प्रसंगी नामांकित विकासक महेश अग्रवाल, राजन बांदेकर क्रेडाई एमसीएचआय कल्याण-डोंबिवली अध्यक्ष राजेश गुप्ता, सुनील चव्हाण तसेच कल्याण-डोंबिवली महानगरपालिका आयुक्त इंदुराणी जाखड शहर अभियंता अनिता परदेशी, एडीटीपी दिक्षा सावंत, कार्यकारी अभियंता सुरेन्द्र टेगळे, नगररचना विभागातील अधिकारी, आर्किटेक्ट असोसिएशनचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हे सेमिनार इज ऑफ डुइंग बिझनेस आनुषंगाने नगररचना विभागामार्फत देण्यात येणाऱ्या विविध बांधकाम परवानग्या यामध्ये सुसुत्रता समीकरण तसेच विलंब टाळण्याच्या अनुषंगाने स्टँडर्ड ऑपरेशिंग सिस्टीमबाबत इंदूराणी जाखड यांनी मॅन्यूअल प्रसिद्ध करण्यात येणार असल्याबाबत जाहीर केले.

### प्रवाशांना मोबाईल ॲपद्वारे मिळणार तिकीट, बसचे ठिकाण, वेळही जाणून घेता येणार

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले 'माझी टीएमटी' या मोबाईल ॲपचे लोकार्पण

◆ ठाणे ( प्रतिनिधी):

ठाणे परिवहन सेवेच्या प्रवाशांना विविध सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या 'माझी टीएमटी' (Mazi TMT) या मोबाईल ॲपचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते नुकतेच लोकार्पण करण्यात आले. या ॲपमुळे प्रवाशांना यूपीआयद्वारे डिजिटल तिकिट काढण्याची सुविधा मिळणार आहे. सध्या ही सुविधा काही बसमार्गावर सुरू करण्यात आली आहे. ती टप्प्याटप्प्याने टीएमटीच्या सर्व बसमार्गांवर प्रवाशांना वापरता येणार आहे.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी (११ ऑक्टोबर २०२४) धर्मवीर आनंद दिघे वाचनालय आणि अभ्यासिकेचे लोकार्पण केले. त्याच ठिकाणी ठाणे महापालिका परिवहन सेवेच्या 'माझी टीएमटी' (Mazi TMT) या मोबाईल ॲपचेही लोकार्पण करण्यात आले.

या मोबाईल ॲपद्वारे तिकीट काढण्याची पद्धत, बसमधील वाहकाकडून त्याचे केले जाणारे व्हेरिफिकेशन याचा डेमो याप्रसंगी मुख्यमंत्री शिंदे यांनी पाहिला. प्रवाशांसाठी ही चांगली सुविधा असल्याचे प्रतिपादन याप्रसंगी मुख्यमंत्री शिंदे यांनी केले. यावेळी, खासदार नरेश म्हस्के, आमदार प्रताप सरनाईक, महापालिका आयुक्त सौरभ राव, अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, टीएमटीचे व्यवस्थापक भालचंद्र बेहरे, माजी नगरसेवक विकास रेपाळे, नम्रता भोसले आदी मान्यवर उपस्थित होते.

या मोबाईल ॲपद्वारे प्रवाशांना यूपीआय वापरून डिजिटल तिकीट काढता येईल. तसेच, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, नेट बॅंकिंगचा वापर करून पैसे भरता येतील. त्याचप्रमाणे, प्रवाशांना बस कोठे आणि किती वेळेत स्टॉपवर येणार याची माहिती देण्याची सुविधाही या ॲपमध्ये आहे.

प्रवाशांना ॲपवर प्रवासाच्या सुरुवातीचे ठिकाण आणि गंतव्य स्थान यांची माहिती भरून बसमार्ग, त्या मार्गावरील उपलब्ध बसगाड्या, त्यासाठी लागणारे तिकीट भाडे याचीही माहिती मिळणार आहे. डिजिटल तिकिटांच्या व्यवस्थेमुळे वाहकांची रोख रक्कम हाताळण्याची संख्या कमी होईल आणि सुटे पैसे नसल्याने प्रवासी आणि वाहक यांच्यात होणारे वाद यामुळे टळतील, अशी अपेक्षाही टीएमटी व्यवस्थापनाला आहे.

सध्या ॲपद्वारे तिकिटांची ही सुविधा काही बसमार्गावर सुरू करण्यात आली आहे. ती टप्प्याटप्प्याने टीएमटीच्या सर्व बसमार्गांवर प्रवाशांना वापरता येणार असल्याचे टीएमटी व्यवस्थापनाने सांगितले.

## शैलेश वडनेरे यांना पक्ष संघटनांचा पाठिंबा

◆ मुरबाड (वार्ताहर):

विधानसभा मतदारसंघात शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून उमेदवारीसाठी इच्छुक असलेल्या शैलेश वडनेरे यांना सर्व ठिकाणी चांगला पाठिंबा मिळत आहे. काँग्रेससह विविध पक्ष संघटनांनी शैलेश वडनेरे यांच्या उमेदवारीला पाठिंबा दर्शविला असून त्यामुळे त्याबद्दल शैलेश वडनेरे यांनी या पक्ष संघटनांचे आभार मानले.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुरबाड विधानसभा मतदारसंघात राजकीय हालचालींना वेग आला. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे बदलापूर शहराध्यक्ष शैलेश वडनेरेही मुरबाड विधानसभेच्या उमेदवारीसाठी इच्छुक आहेत. नुकतेच शैलेश वडनेरे यांनी त्यांच्या समर्थकांसह पक्षाध्यक्ष



शरद पवार, खासदार सुप्रिया सुळे तसेच अन्य नेत्यांच्या भेटी घेतल्या. काँग्रेसचे शहराध्यक्ष संजय जाधव यांनी शैलेश वडनेरे यांच्या उमेदवारीला पाठिंबा दिला. उच्चशिक्षित असलेले शैलेश वडनेरे मुरबाड मतदारसंघातून निवडून येतील, असा विश्वास जाधव यांनी व्यक्त केला. आरपीआय प्रदेश सचिव अशोक गजरमल, बदलापूर रेल्वे प्रवसी संघटनेचे अध्यक्ष राजेंद्र नरसाळे, शरद पवार गटाचे सेवादल शहराध्यक्ष विशाल सरकारे वाघचौडे व इतर पदाधिकाऱ्यांनी वडनेरे यांना पाठिंबा दिला आहे.

# पालकमंत्र्यांकडून दहशतीला खतपाणी

## राजेभाऊ फड — मूर्तीत गावगुंडांनी दुचाकी जाळल्या



परळी / पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी विधानसभा मतदारसंघात कायम दहशतीचे आणि दादागिरीचे वातावरण असल्याचे सर्वश्रुत आहे. येथील जनतेला नेहमीच अन्याय आणि अत्याचाराला सामोरे जावे लागते. लोकसभेच्या निवडणुकीत विरोधात प्रचार केला म्हणून काहींच्या गाड्या जाळण्यात आल्या असून, गड्याबरोबर तुलाही जाळून टाकू अशी धमकी देण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. मूर्ती येथील देविदास फड आणि अरुण फड या दोघा सख्ख्या भावांच्या दुचाकी जाळण्याचा प्रकार घडला आहे. कृषिमंत्री आणि पालकमंत्री यांच्या गावगुंडांनी दहशत माजविणारा हा प्रकार केला असून अशी दादागिरी यापुढे चालू दिली जाणार नाही. जशास तसे उत्तर दिले जाईल असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे युवा नेते राजेभाऊ फड यांनी दिला आहे. मूर्ती येथे जाऊन त्यांनी फड कुटुंबाची भेट घेत त्यांना धीर दिला.परळी मतदारसंघातील मूर्ती या गावचे देविदास बालासाहेब फड व अरुण बालासाहेब फड हे दोन बंधू नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बूथ प्रमुख झाल्याने कृषिमंत्री तथा पालकमंत्र्यांच्या गावगुंडांनी दहशत करून त्यांच्या दोन्ही दुचाकी जाळल्या तसेच येत्या विधानसभा निवडणुकीत राजेभाऊ फड यांचे काम केलेस तर तुलाही जाळायला मागेपुढे पाहणार नसल्याची धमकीही विरोधकांनी दिलीय. शनिवारी रात्रीच्या सुमारास हा प्रकार घडला असून, राजेभाऊ फड यांनी सोमवारी मूर्ती येथे जाऊन फड बंधूंची भेट घेतली आणि त्यांना धीर दिला. यावर प्रतिक्रिया देत असताना ते म्हणाले की, घडलेला प्रकार हा पालकमंत्र्यांनी

पान २ वर...

### दादागिरी खपवून घेणार नाही: राजेभाऊ फड

परळी मतदारसंघात दादागिरी आणि दहशतीचे वातावरण निर्माण केले जात आहे. अन्याय अत्याचाराच्या विरोधात बोलणाऱ्या नागरिकांचा आवाज दाबला जातो. लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे काम केले म्हणून मूर्ती येथील फड बंधूंच्या दुचाकी जाळून त्यांना धमक्या देण्यात आल्या. याबाबत आम्ही पोलीस प्रशासनाशी संपर्क करून कारवाईची मागणी केली आहे. आपल्याला भविष्यात भयमुक्त परळी करायची असून, असे प्रकार भविष्यात चालू दिले जाणार नाही असा इशारा राजेभाऊ फड यांनी दिला आहे.

# सामाजिक ऋणानुबंधातून वाढदिवस!

**जिव्हाळा:** डॉ.गोपाल बछिरेंच्या वाढदिवसादिनी विविध उपक्रम



लोणार/पुण्यभूमी प्रतिनिधी

लोणार डॉ. गोपाल बछिरे यांचा वाढदिवस समाज उपयोगी विविध उपक्रमाने साजरा करण्यात आला महाविकास आघाडीच्या माध्यमाने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा संघटक तथा सामाजिक कार्यकर्ते डॉ. गोपाल बछीरे यांच्या वाढदिवसानिमित्त, गोशाळेमध्ये गाईंना चारा वैरण देण्यात आले, वैदु गोंड पारधी महिला भगिनी यांना साड्यांचे वाटप करून एक सामाजिक बांधिलकी जपण्यात आली, गरजवंतांना ब्लँकेट चे वाटप करण्यात आले तसेच आर्थिक दृष्ट्या दुर्बल गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले हे उपक्रम दिवसभर चालले व सायंकाळी महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्ष यांचे नेते कार्यकर्ते व डॉ. बछिरे यांच्यावर प्रेम करणारे आप्त इष्ट लोकांनी त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला याप्रसंगी राष्ट्रीय काँग्रेसचे शैलेश सावजी, कलीम खान, नंदकुमार गोरे, देवानंद पवार, भूषणभाऊ मापारी, ज्ञानेश्वर चिभडे मामा, केशवराव फुके, शांतीलाल गोगलिया, अमोल सोनवणे, तोफिक कुरेशी, विकास मोरे, राष्ट्रवादीचे सदानंद पाटील तेजनकर, इब्राहिम शेख, दत्ता पाटील घनमट, विजय मोरे, वाजेद खान, शिवसेना उद्धव

पान २ वर...

# आचारसंहिता, विकास कामांचा धडाका थंड!

**धोरण:** आ.लक्ष्मण पवारांनी कोटींचा निधी खेचून आणला



गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई विधानसभा मतदारसंघ नेहमी विकासाच्या प्रतीक्षेत होता अनेक गावांना सवतंत्र काळापासून रस्ता नव्हता हे सर्व थांबल ॲड. लक्ष्मण पवार आमदार होताच. २०१४ सालापासून जी विकासाची गंगा आमदार लक्ष्मण पवार यांच्या माध्यमातून तालुक्यात आली ती विकासा मुळे कोणी रोखू शकले नाही. आमदार लक्ष्मण पवार यांच्या माध्यमातून तालुक्यात रस्त्याच जाळच निर्माण झाल. याचा प्रत्येय या पंधरा दिवसात तालुक्यातील मतदार व नागरिकांना आलेला आहे. दि २ ऑक्टोबर पासून जो कोटी रुपयांच्या उद्घाटनाचा धडाका सुरू झाला होता तो आचारसंहितेमुळे थांबला. जे कधी तालुक्याने आकडा ऐकला नसेल अशा आकड्यांमध्ये उद्घाटने झाली. रोज २५ कोटी, ५० कोटी अशा पद्धतीचे उद्घाटन करण्यात आली. एवढे उद्घाटनेकरुन युवा नेते शिवराज दादा पवार यांना थकवा येतो की काय अशी परिस्थिती निर्माण झाली होती. दिनांक १५ ऑक्टोबर रोजी ११४ कोटी रुपयांचं उद्घाटन युवा नेते शिवराज दादा पवार यांच्या हस्ते करण्यात आलं. नुसते उद्घाटन न होता प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली असून येत्या काळात उद्घाटन झालेल्या ठिकाणी दर्जे दार कामे आपल्याला पाहायला मिळणार आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, गेवराई तालुका म्हटलं एक आगळ्यावेगळ्या नजरेने तालुक्याकडे पाहिलं जात होतं एकाच रस्त्याचे दोन-दोन, तीन-तीन उद्घाटन होताने पाहिले आहे. हे कुठेतरी थांबणे गरजेचे होतं आणि हे थांबवण्यासाठी पुढाकार घेतला ॲड लक्ष्मण पवार यांनी. २०१४ च्या निवडणुकीमध्ये मोठ्या मताधिक्याने निवडून येऊन विकासाची गंगा तालुक्यामध्ये घेऊन आले. २०१४ साली सुरू झालेले विकासाचे पर्व आजपर्यंत थांबलेलं नाही. आमदारकीच पद स्वतःसाठी नसून जनतेच्या सेवेसाठी असल्याची जाण त्यांना असल्याकारणाने

पान २ वर...

# खेळातही करिअरच्या नामी संधी

**अभिनंदनिय:** कुस्ती स्पर्धेमध्ये यशवर्धन कांबळेची बाजी



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा गावंदरा येथील यशवर्धन सुरेश कांबळे याचा परभणी येथे झालेल्या दिनांक १५ क्टोबर २०२४ रोजी झालेल्या कुस्ती स्पर्धेत वयोगट १४ वर्ष ५७ किलो वजनी गटात विभागात दुतीय क्रमांक मिळवला. तालुक्यातील गटशिक्षण अधिकारी कोल्हे साहेब,गिरी साहेब वरिष्ठ विस्तार अधिकारी अंडील साहेब ,केंद्राचे केंद्र प्रमुख घोळवे सर केंद्रीय मुख्याध्यापक साखरे सर क्रीडा शिक्षक कदम सर व्यवस्थापन समिती अध्यक्ष अरुण बडे ग्रामपंचायत सरपंच आयुध्या सौंदरमल

पान २ वर...

# क्रीडा संकुल उभारणीचा मार्ग मोकळा!

**धनंजय मुंडे :** ५ हेक्टर ३० आर जागा क्रीडा संकुलासाठी हस्तांतरित!



मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी वैजनाथ शहरातील व तालुक्यातील नागरिकांचा अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न असलेल्या क्रीडा संकुल उभारण्याच्या दृष्टीने पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी मोठे पाऊल उचलले असून, परळी शहरालगतच्या जलालपूर येथील ५ हेक्टर ३० आर जागा क्रीडा संकुलास मोफत उपलब्ध करून देण्याचा निर्णय आज धनंजय मुंडे यांच्या पुढाकारातून ऊर्जा विभागाने घेतला आहे.

सदर ५ हेक्टर ३० आर जमीन महानिर्मिती कडून मोफत घेऊन ती महसूल विभागास हस्तांतरित करण्यात येत असून, याबाबतचा शासन निर्णय आज उद्योग-ऊर्जा व कामगार विभागाने निर्गमित केला आहे. त्यामुळे आता परळीच्या क्रीडा संकुल उभारणीचा मार्ग मोकळा झाला आहे. परळीच्या मातीतून विविध क्रीडा प्रकारातील अनेक खेळाडू राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचले आहेत. दरवर्षी धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर क्रिकेटसह विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजनही केले जाते. मात्र या खेळाडूंना सरावासाठी क्रीडा संकुल उपलब्ध नसल्याने खेळाडूंची गैरसोय होत होती. त्यादृष्टीने धनंजय मुंडे यांनी क्रीडा विभागामार्फत राज्याचे क्रीडामंत्री संजय बनसोडे यांच्यामार्फत जमीन ऊर्जा विभागाकडून हस्तांतरित करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. सदर प्रस्ताव मंजूर करण्यासाठी धनंजय मुंडे यांनी उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ही सातत्याने पाठपुरावा केला. या पाठपुराव्याला अखेर आज यश आले असून महानिर्मितीच्या परळी येथील औष्णिक विद्युत केंद्राच्या मालकीची जलालपुर येथील ८.५ हेक्टर जागेपैकी वापरात नसलेली व भविष्यात कोणतेही प्रयोजन नसलेली ५ हेक्टर ३० आर जमीन क्रीडा संकुलासाठी मोफत उपलब्ध करून देण्यात आली आहे. परळीत धनंजय मुंडे

पान २ वर...

# शादीखान्यासाठी निधी मंजूर

## मुस्लिम बांधवांनी मानले आभार

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी



बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी परळी मतदारसंघातील घाटनांदूर येथील मुस्लिम बांधवांना दिलेला शब्द पूर्ण केला असून, आज आचार संहिता लागण्यापूर्वी घाटनांदूर येथील शादीखाना उभारण्यासाठी अल्पसंख्यांक विकास विभागाकडून ७५ लाख रुपये निधी खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

याबाबतचा शासन निर्णय अल्पसंख्यांक विकास विभागाकडून आज निर्गमित करण्यात आला असून, याबद्दल धनंजय मुंडे यांनी अल्पसंख्याक विकास विभागाचे मंत्री अब्दुल सत्तार यांचे आभार मानले आहेत. धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून याआधी सिरसाळा येथील शादीखान्याचे बांधकाम पूर्ण झाले आहे. त्याचबरोबर बरदापुर, पोहनेर, मिरवट, धसवाडी, पिंपळा धायगुडा आदी गावांमध्ये शादीखाने उभारण्यास निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

# सामाजिक दायित्वातून राबविला उपक्रम!

**नियोजन:** रोटरी मिडटाऊन,अनिलदादा जगताप मित्रमंडळाचा उपक्रम

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

सामाजिक कार्यात कायम प्राधान्याने पुढाकार घेत असलेल्या रोटरी मिडटाऊन आणि अनिलदादा जगताप मित्रमंडळाच्या संयुक्त विद्यमाने एस. टी. चालक, वाहक, कर्मचाऱ्यांसाठी मोफत बी. पी., शुगर, नेत्रतपासणी, चष्मे वाटप, मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीराचे दिनांक १६/१०/२०२४ व १७/१०/२०२४ रोजी सकाळी १०.०० ते ४.०० यावेळेत बस स्थानक परिसरात आयोजन करण्यात आले आहे. एस. टी. चालक, वाहक, कर्मचारी हे अहोरात्र प्रवश्यांसाठी तत्पर सेवा देत असतात, त्यामध्ये त्यांचे शरीराकडे अगदी दुर्लक्ष होत राहते असं म्हंटलं तर वावगं ठरणार नाही. एस टी चा प्रवास सुखाचा प्रवास हे ब्रीद वाक्य उराशी घेवून हे कर्मचारी काम करत असतात. मागे अशीच बातमी वाचण्यात आली की, चालकाला हृदय विकाराचा झटका आला तरी त्यांने प्रसंगावधान राखून गाडीतील प्रवशांचा जीव वाचवला. असे प्रकार होवू नये म्हणून म्हणतात ना प्रिव्हेनशन इज बेटर द्यान क्युअर या उद्देशाने एस.



टी. चालक, वाहक, कर्मचाऱ्यांसाठी मोफत बी. पी., शुगर, नेत्रतपासणी, चष्मे वाटप, मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर रोटरी मिडटाऊन व अनिल दादा जगताप मित्रमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक१६/१०/२०२४ व १७/१०/२०२४ रोजी सकाळी १०.०० ते ४.०० यावेळेत बस स्थानक परिसरात घेण्यात येणार आहे. या शिबीरामध्ये सर्व तपासण्या या चंपावती नेत्रालय येथील तज्ञ डॉक्टर व रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊनचे तज्ञ डॉक्टर करणार आहेत. यामध्ये चंपावती नेत्रालय येथील तज्ञ डॉक्टर डॉ. नारायण आळणे, डॉ. प्रदिप सानप, डॉ. रविंद्र गालफाडे व त्यांची टीम तसेच रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन चे तज्ञ डॉ. रो. किरण सवासे, रो. डॉ. निलेश जगदाळे हे सेवा देणार आहेत. या शिबीरामध्ये तपासणी केल्यावर मोफत नंबरचे चष्मे देण्यात येणार आहेत, तसेच बी. पी. शुगर हे देखील मोफत तपसण्यात येणार असून त्यांना त्यानुसार योग्य तो सल्ला देण्यात येणार आहे. विशेष म्हणजे ज्या तपासणी केलेल्या चालक वाहक व कर्मचारी यांना मोतिबिंदू चे निदान होईल अशाचे मोतिबिंदू चे ऑपरेशन देखील मोफत करण्यात येणार आहे. रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन व अनिल दादा जगताप मित्र मंडळ हे दोन्ही सामाजिक, सांस्कृतिक व आरोग्य विषयक सामाजिक उपक्रम घेत असतात यावेळी या दोन्ही सामाजिक संघटनाच्या संयुक्त विद्यमाने हा एस.टी. चालक, वाहक व इतर कर्मचारी यांच्यासाठी हा अत्यंत महत्वाचा उपक्रम हाती घेण्यात आला

पान २ वर...

# सराफा दुकानातून सोने लांबवले

**भयभित:** माजलगाव पोलिसांत गुन्हा दाखल



माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

शहरातील बीड रोडवर असलेल्या देशमुख सराफ या दुकानातून दोन अज्ञात चोरट्यांनी हातचलाखी करून ५० हजार रुपयांचे सोने लांबवल्याची घटना मंगळवारी दुपारी घडली, याप्रकरणी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहर पोलीस स्टेशन पासून हाकेच्या अंतरावर असलेल्या बीड रोडवरील व्यंकटेश कॉम्प्लेक्स मधील देशमुख सराफ या सोने-चांदीच्या दुकानात मंगळवारी दुपारी साडेबाराच्या सुमारास अज्ञात दोन चोरट्यांनी प्रवेश केला व त्यांनी सोन्याचे दागिने बघण्याच्या बहाण्याने सोन्याचे कानातील दागिने दाखवत असताना हातचलाखी करून त्यातील सात ग्रॅमच्या दोन कानातले एका चोरट्याने अलगद आपल्या खिशात टाकले त्यानंतर सराफाला बोलण्याच्या नादात गुंगवून हे चोरटे पसार झाले. सदरील बॉक्सचे वजन कमी भरल्याने शंका आल्याने सराफ दुकानदार

पान २ वर...

## निर्णय — गट विकास अधिकारी पदाचा राठोडांनी घेतला पदभार

# बेशिस्त कारभाराला शिस्तीचे आव्हान!

गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई पंचायत समिती गट विकास अधिकारी पदाचा पदभार दि. १५ ऑक्टोबर रोजी अशोक राठोड यांनी स्वीकारला यानंतर कर्मचारी, समाजसेवक, शेतकरी, लाभार्थी यांच्या वतीने राठोड यांचा सत्कार करण्यात आला. गेवराई पंचायत समिती नेहमी कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असते. पंचायत समितीच्या तत्कालीन गटविकास अधिकारी मीना कांबळे यांनी रजेवर जाताच त्यांच्या जागी अशोक राठोड यांची नियुक्ती करण्यात आली. आचारसंहितेच्या तोंडावर गटविकास अधिकारी मीना कांबळे यांनी रजा घेतल्याने अनेक चर्चा ऐकायला मिळत होत्या परंतु अशोक राठोड यांच्या स्वरूपामध्ये एक चांगला गटविकास अधिकारी मिळाला असून बेशिस्त कारभाराला शिस्त लावण्याचे



आव्हान अशोक राठोड यांच्यासमोर आहे.

याबाबत सविस्तर वृत्ताची की, पंचायत समितीच्या मार्फत अनेक योजना ग्रामपंचायत पर्यंत पोहोचवल्या जातात. नरेगा मार्फत अनेक पैशांची उलाढाल देवाण-घेवाण पंचायत समिती कार्यालयामध्ये होते. अनेक जणांचा योजनांच्या मार्फत पैसे कमावण्याचा धंदा होऊन बसला आहे. पंचायत समितीला सभापती नसल्याने अधिकारी व कर्मचारी यांचा मनमानी कारभार कसा असतो हे या काळात पाहायला मिळाले. वाटतील तितके पैसे घेऊन नियमात बसत नसलेले कामे या काळामध्ये करण्यात आले. अनेक जण लाच लुचपत विभागाच्या जाळ्यामध्ये अडकल्याच्या बातम्या आपण ऐकलेल्या आहे. पंचायत समितीचा कारभार हा कार्यालयातून न चलता आजूबाजूच्या हॉटेल व झेरॉक्स सेंटरमधून चालत होता. आचारसंहिता लागणार अशा चर्चा अनेक दिवसापासून चालू होत्या याच काळात गटविकास अधिकारी मीना कांबळे यांनी रजा मागितली व त्यांना ती रजा मंजूर झाली व त्या अनेक दिवसांच्या रजेवर गेल्या आहेत. निवडणूक संपेपर्यंत रुजू होतील का नाही यामध्ये शंका आहे. श्रीमती मीना कांबळे यांची रजा मंजूर होताच त्यांच्या जागी अशोक राठोड यांची गटविकास अधिकारी पदी नियुक्ती करण्यात आली. अशोक राठोड यांच्यासमोर पंचायत समितीचा बेसिस्त कारभार, शिस्तीत

पान २ वर...

# विद्यार्थ्यांनी आवडीच्या क्षेत्रात झेप घ्यावी

**डॉ हनुमंत सौदागर:** स्वामी विवेकानंद विद्यालयाचे यश



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

तालुक्यातील सोनीजवळा येथील स्वामी विवेकानंद माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थिनी आरती सुनील भांडवलकर हिने कुस्ती स्पर्धेत विभागीय स्तरावर विजय मिळवला व राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी ती पात्र झाली आहे. या यशाबद्दल स्वामी विवेकानंद विद्यालय व युनिक फाउंडेशन च्यावतीने सन्मान चिन्ह सन्मानपत्र आणि रोख पारितोषिक देऊन डॉ हनुमंत सौदागर यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे अध्यक्ष रतन भांडवलकर, प्रमुख पाहुणे डॉ हनुमंत सौदागर, सचिव शंकर पाखरे,संस्थेचे उपाध्यक्ष शंकरराव ससाने,मुख्याध्यापक मंगेश गिरी यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी बोलताना डॉ सौदागर म्हणाले विद्यार्थ्यांनी आवडीच्या क्षेत्रामध्ये जिद्दीने प्रयत्न करावेत यश नक्की मिळते ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता आहे शिक्षक आणि पालकांनी त्यांना भक्कम साथ दिली पाहिजे. कुस्ती स्पर्धेत जिल्हास्तरावर विजयी झालेल्या पूजा भांडवलकर चा आहे सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व सहशिक्षकांनी परिश्रम घेतले.कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.